# नाशिक महानगरपालिका, नाशिक

सामान्य प्रशासन विभाग

राजीव गांधी भवन, शरणपूर रोड, नाशिक - ४२२००२

नामनपा जाहिरात क्र.०२/२०२५ दिनांक ०४/११/२०२५

## -: नाशिक महानगरपालिका पदभरती:-

नाशिक महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील गट-क व गट-ड मधील आपत्ती व्यवस्थापन व अग्निशमन संवर्गातील रिक्त पदे सरळसेवा भरती प्रक्रियेद्वारे भरण्यासाठी , प्रस्तुत जाहिरातीत नमुद केलेप्रमाणे पदांची शैक्षणिक अर्हता व इतर अटी शर्तींची पुर्तता करणाऱ्या पात्र उमेदवारांकडून Online पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

प्रस्तुत जाहिरातीमधील पदे ही आपत्ती व्यवस्थापन व अग्निशमन सेवेमधील आहेत. सदर भरतीसाठी पुरेसा प्रतिसाद प्राप्त होण्याकरीता जाहिरात देण्यात येत आहे . सदर जाहिरातीनूसार गट 'क' व गट 'ड' मधील एकूण १८६ पदांकरीता अर्ज करण्याचा कालावधी दिनांक १०/११/२०२५ पासून ते दिनांक ०१/१२/२०२५ रोजी पर्यंत आहे. इच्छुक उमेदवारांनी www.nmc.gov.in या संकेतस्थळावर दिनांक १०/११/२०२५ पासून ते दिनांक ०१/१२/२०२५ या दिवशी रात्री ११.५५ वाजेपर्यंत Online पद्धतीने अर्ज करावेत . प्रस्तुत जाहिरातीच्या अनुषंगाने भरावयाचे पदाचे पदनाम , वेतनश्रेणी, पदसंख्या याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | पदनाम | वर्ग | ७ व्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी | पद संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | चालक –यंत्रचालक/ वाहनचालक (अग्निशमन) | क | S-७, २१७००-६९१०० | ३६ |
| २ | फायरमन (अग्निशामक) | ड | S-६, १९९००-६३२०० | १५० |

### ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी वेळापत्रक

| अ.क्र. | तपशील | दिनांक |
|---|---|---|
| १ | ऑनलाईन पद्धतीने अर्ज नोंदणी सुरु होण्याचा दिनांक | दि.१०/११/२०२५ |
| २ | ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक | दि.०१/१२/२०२५, वेळ रात्री ११.५५ पर्यत |
| ३ | ऑनलाइन पद्धतीने परीक्षा शुल्क भरणेची अंतिम मुदत | दि.०१/१२/२०२५ |
| ४ | परीक्षेसाठी ऑनलाईन प्रवेशपत्र उपलब्ध होण्याचा दिनांक | परीक्षेच्या ७ दिवस आधी |
| ५ | ऑनलाईन परीक्षेचा दिनांक (प्रवेश पत्रात नमूद केल्यानुसार) | नाशिक महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर उपलब्ध असेल. |

*** परीक्षा शुल्क :-**

| आकारण्यात येणारे शुल्क | |
|---|---|
| **खुला प्रवर्ग** | **मागास प्रवर्ग व अनाथ प्रवर्ग** |
| **₹१,०००/-** | **₹९००/-** |

* परीक्षेचा दिनांक , वेळ व केंद्र प्रवेशपत्रामध्ये नमूद केले जाईल . संभाव्य बदलाबाबत वेळो वेळी नाशिक महानगरपालिका www.nmc.gov.in या संकेत स्थळावर माहिती प्रसारित केली जाईल . यांची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

Mahabharti.in

ऑनलाईन अर्ज करण्याची पद्धत इत्यादी बाबतचा तपशिल व ऑनलाईन अर्ज करण्यासाठी www.nmc.gov.in या संकेत स्थळावर भेट देण्यात यावी. तसेच संवर्गनिहाय भरावयाची पदे, पदांचा तपशिल, वेतनश्रेणी, वयोमर्यादा / वयोमर्यादा शिथिलता, निवड पद्धत, सर्व साधारण सूचना, अटी व शर्ती, शैक्षणिक अर्हता, सामाजिक व समांतर आरक्षण तसेच आरक्षणाबाबत तरतूदी, पदनिहाय ऑनलाईन परीक्षेचा अभ्यासक्रम, परीक्षा शुल्क, अर्ज भरणेबाबत मार्गदर्शक सूचना इत्यादी बाबतचा तपशिल www.nmc.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे. सदरची परीक्षा स्थगित करणे, रद्द करणे, अंशत: बदल करणे, पदांच्या एकुण संख्येमध्ये बदल करण्याचा अधिकार नियुक्ती प्राधिकारी यांनी राखून ठेवला आहे.

सही /-
मनिषा खत्री, भाप्रसे
आयुक्त तथा प्रशासक
नाशिक महानगरपालिका, नाशिक

दिनांक :-०४/११/२०२५
ठिकाण :- नाशिक

Mahabharti.in

**-: पदनाम, पदसंख्या, आरक्षण तपशील, पदनिहाय आवश्यक शैक्षणिक अर्हता व अनुभव व वेतनश्रेणी तपशील :-**

१) पदनाम :- चालक-यंत्रचालक/ वाहनचालक (अग्निशमन) (गट-क), वेतनश्रेणी :- एस - ६, १९९००-६३२००

| चालक / यंत्रचालक | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| जात प्रवर्ग | अ.जा. १०% | अ.ज. २२% | वि.जा. (अ) ३% | भ.ज. (ब) २.५% | भ.ज. (क) ३.५% | भ.ज. (ड) २% | वि.मा.प्र. २% | इ.मा.व. १५% | सा.शै.मा.व. ८% | आ.दु.घ. (EWS) ८% | खुला (अराखीव) २४% | एकुण पदे १००% |
| जागा | ४ | ८ | १ | १ | १ | १ | १ | ५ | ३ | ३ | ८ | ३६ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरण खालीलप्रमाणे आहे. | | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | २ | ४ | १ | १ | १ | १ | १ | १ | २ | २ | ४ | २० |
| महिला (३०%) | १ | २ | ० | ० | ० | ० | ० | २ | १ | १ | २ | ९ |
| माजी सैनिक (१५%) | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | १ | ४ |
| अंशकालीन (१०%) | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | १ | ३ |
| खेळाडू (५%) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| प्रकल्पग्रस्त (५%) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| भुकंपग्रस्त (२%) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| **दिव्यांग (४%)** | ० | | | | | | | | | | | |
| अनाथ (१%) | ० | | | | | | | | | | | |

**अ) शैक्षणिक पात्रता :-**

१) माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक

२) राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र, मुंबई यांचा ६ महिने कालावधीचा अग्निशामक पाठयक्रम पुर्ण केलेला असल्यास प्राधान्य.

३) वाहनचालक या पदावर किमान ३ वर्षे काम केल्याचा अनुभव असणे आवश्यक.

४) वैध जडवाहन चालविण्यासाठी परवाना असणे आवश्यक

५) मराठी भाषेतून प्रशासकीय कामकाज करता यावे यासाठी मराठीचे ज्ञान असणे आवश्यक आहे. (लिहीणे, वाचणे व बोलणे)

**ब) किमान शारीरीक पात्रता :-**

१) उंची – १६५ से.मी., (महिला उमेदवारांची उंची १५७ से.मी.),

२) छाती – साधारण ८१ सें.मी. फुगवून ५ से.मी. जास्त (महिला उमेदवारांसाठी लागू नाही.)

३) वजन – किमान ५० कि.ग्रॅम (पुरुष) व किमान ४६ कि.ग्रॅम (महिला)

४) दृष्टी – चांगली

**क) पाठयक्रम :-**

उमेदवाराची नियुक्ती झाल्यानंतर , त्यांना राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र , महाराष्ट्र शासन, मुंबई यांचा अग्निशामक प्रशिक्षण पाठयक्रम पुर्ण केला नसेल तर त्या प्रशिक्षण केंद्राचा ०३ महिने कालावधीचा प्राथमिक अग्निशमन प्रशिक्षण पाठयक्रम पुर्ण करणे आवश्यक राहील.

Mahabharti.in

२) पदनाम :- फायरमन (अग्निशामक) (गट-ड), वेतनश्रेणी :- एस - ६, १९९००-६३२००

| फायरमन (अग्निशामक) | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| जात प्रवर्ग | अ.जा. १०% | अ.ज. २२% | वि.जा. (अ) ३% | भ.ज. (ब) २.५% | भ.ज. (क) ३.५% | भ.ज. (ड) २% | वि.मा.प्र. २% | इ.मा.व. १५% | सा.शै.मा.व. ८% | आ.दु.घ. (EWS) ८% | खुला (अराखीव) २४% | एकुण पदे १००% |
| जागा | १५ | ३३ | ५ | ४ | ५ | ३ | ३ | २३ | १२ | १२ | ३५ | १५० |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरण खालीलप्रमाणे आहे. | | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | ४ | १० | १ | २ | १ | २ | २ | ९ | ३ | ३ | ११ | ४८ |
| महिला (३०%) | ५ | १० | २ | १ | २ | १ | १ | ७ | ४ | ४ | ११ | ४८ |
| माजी सैनिक (१५%) | २ | ५ | १ | १ | १ | ० | ० | ३ | २ | २ | ५ | २२ |
| अंशकालीन (१०%) | २ | ३ | १ | ० | १ | ० | ० | २ | १ | १ | ४ | १५ |
| खेळाडू (५%) | १ | २ | ० | ० | ० | ० | ० | १ | १ | १ | २ | ८ |
| प्रकल्पग्रस्त (५%) | १ | २ | ० | ० | ० | ० | ० | १ | १ | १ | २ | ८ |
| भुकंपग्रस्त (२%) | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| **दिव्यांग (४%)** | ० | | | | | | | | | | | |
| अनाथ (१%) | २ | | | | | | | | | | | |

<u>अ) शैक्षणिक पात्रता :-</u>

१) माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक

२) राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र, मुंबई यांचा ६ महिने कालावधीचा अग्निशामक पाठयक्रम पुर्ण केलेला असावा.

३) मराठी भाषेतून प्रशासकीय कामकाज करता यावे यासाठी मराठीचे ज्ञान असणे आवश्यक आहे. (लिहीणे, वाचणे व बोलणे)

**ब) किमान शारीरीक पात्रता :-**

१) उंची – १६५ से.मी., (महिला उमेदवारांची उंची १५७ से.मी.),

२) छाती – साधारण ८१ सें.मी. फुगवून ५ से.मी. जास्त (महिला उमेदवारांसाठी लागू नाही.)

३) वजन – किमान ५० कि.ग्रॅम (पुरुष) व किमान ४६ कि.ग्रॅम (महिला)

४) दृष्टी – चांगली

**<u>टिप :-</u>**

**१) वर नमुद केलेल्या पदसंख्या, आरक्षण व इतर तरतुदी मध्ये वाढ, घट अथवा बदल होण्याची शक्यता आहे.**

**२) सदरची परीक्षा स्थगित करणे , रद्द करणे, अंशत: बदल करणे, पदांच्या एकुण संख्येमध्ये बदल करण्याचा अधिकार नियुक्ती प्राधिकारी यांनी राखून ठेवला आहे.**

## १. सर्वसाधारण सूचना :-

| | |
|---|---|
| १.१ | उपरोक्त नमूद संवर्गातील पदासाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्यापुर्वी उमेदवारांनी स्वतः खात्री करावायची आहे की, ते अर्ज करीत असलेल्या पदासाठी विहीत अर्हता/अटींची पूर्तता करीत असून सदर पदाकरिता ते पात्र आहेत. |
| १.२ | ऑनलाईन पध्दतीने अर्ज करण्यासाठी उमेदवाराकडे नित्य वापरात असलेला वैध (Valid) ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी (Mobile No.) असणे आवश्यक आहे. भरती प्रक्रिया परीक्षेचे प्रवेशपत्र तसेच इतर माहिती वेळोवेळी ऑनलाईन पध्दतीने देण्यात येणार असल्याने, भरती प्रक्रियेच्या पूर्ण कालावधीमध्ये सदर ई-मेल आयडी वैध राहणे आवश्यक आहे. |
| १.३ | अराखीव (खुला) पदांकरीता सर्व उच्च गुणवत्ताधारक उमेदवारांचा (मागासवर्ग उमेदवारांसह) विचार केला जात असल्याने सर्व उमेदवारांनी त्यांच्या प्रवर्गासाठी पद आरक्षित / उपलब्ध नसले तरी, अर्जामध्ये त्यांच्या मूळ जात प्रवर्गाची माहिती अचूकपणे नमूद करणे बंधनकारक आहे. |
| १.४ | संबंधित पदाच्या / परीक्षेच्या जाहिरात / अधिसूचनेमध्ये दिलेल्या सर्व सूचनांचे काळजीपूर्वक अवलोकन करुनच अर्ज सादर करावा अर्जामध्ये दिलेल्या माहितीच्या आधारेच पात्रता ग्राह्य धरली जाईल व त्याच्या आधारे निवड प्रक्रिया पूर्ण होईल. |
| १.५ | अर्जातील माहिती/तपशील तसेच अर्जासोबत अर्हतेनुसार उमेदवारांने योग्य कागदपत्र सादर केली आहेत यास अधिन राहून संबंधित उमेदवारास परीक्षेस बसण्यासाठी विचाराधीन करण्यात येईल. त्यामुळे उमेदवारास सदर परीक्षेअंती किमान गुण प्राप्त झाले तरी परीक्षा संबंधित पदाची आवश्यक शैक्षणिक व इतर अर्हते संलग्नच्या कागदपत्राच्या पडताळणीअंती संबंधित उमेदवार |

Mahabharti.in

| | |
|---|---|
| | शिफारस/निवडीस पात्र होईल. त्यामुळे उमेदवारांनी पात्रतेच्या अटी अभ्यासूनच अर्ज सादर करण्याची दक्षता घ्यावी व अर्ज करावा. |
| १.६ | महिला उमेदवारांनी त्यांच्या नावामध्ये काही बदल असल्यास (लग्नापुर्वीच नाव व लग्नानंतरचे नाव) त्यासंदर्भात आवश्यक कागदपत्रे जसे विवाह निबंधक यांनी दिलेला दाखला (विवाहीत स्त्रियांच्या बाबतीत), नावात बदल झाल्या संबंधित अधिसूचित केलेले राजपत्र किंवा राजपत्रित अधिकारी यांच्याकडून नावात बदल झाल्या संबंधिचा दाखला व त्याची छायांकित प्रत परीक्षेच्या वेळेस सादर करणे आवश्यक आहे. |
| १.७ | पत्रव्यवहारासाठी स्वतःचा पत्ता इंग्रजीमध्ये स्पष्ट पणे नोंदवावा. व्यावसायिक मार्गदर्शन केंद्र, स्वयं अध्ययन मार्गदर्शन केंद्र / वर्ग अथवा तत्सम स्वरुपाच्या कोणत्याही मार्गदर्शक केंद्राचा / संस्थेचा पत्ता पत्रव्यवहारासाठी देऊ नये. |
| १.८ | अर्जामध्ये दिलेली माहिती व मूळ कागदपत्रे तपासणी दरम्यान काही कागदपत्रे संशयास्पद वाटली अथवा सादर केलेल्या कागदपत्रांतील माहिती व मूळ अर्जातील माहिती यामध्ये फरक आढळून आल्यास अर्जामध्ये भरलेली माहिती खोटी आहे असे समजण्यात येईल . आवश्यकतेनुसार मुळ शैक्षणिक / इतर कागदपत्रांची संबंधीत शैक्षणिक विद्यापीठ / संस्था यांच्याकडे तपासणी करण्यात ये ईल. तसेच उमेदवार अर्जामधील माहिती संदर्भातील कागदोपत्री पुरावे सादर करू न शकल्यास उमेदवाराची निवड रद्द करण्यात येईल. |
| १.९ | वय, शैक्षणिक अर्हता, मागासवर्ग/क्रिमीलेअर प्रमाणपत्र, महिला, माजी सैनिक, अनाथ, प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त, अंशकालीन कर्मचारी, खेळाडू, अनुभव पात्रता इत्यादी बाबत न चुकता अर्जामध्ये स्पष्टपणे / निर्विवादपणे दावा करणे आवश्यक आहे . अर्जातील संबंधित रकान्यात स्पष्टपणे दावा केला नसल्यास , संबंधीत दाव्याचा विचार केला जाणार नाही . उमेदवाराने अर्ज सादर केल्यानंतर त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल करता येणार नाही. |
| १.१० | ज्या उमेदवारांना यापूर्वी त्यांचे नाव रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राकडे सेवायोजन कार्यालय / समाज कल्याण / आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी /जिल्हा सैनिक बोर्ड / अपंग कल्याण कार्यालय इ . कार्यालयात नोंदविलेले आहे अशा उमेदवारांनी देखि ल स्वतंत्ररित्या ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक राहील , तसेच प्रकल्पग्रस्त , अंशकालीन इत्यादी समांतर आरक्षणांतर्गत येणाऱ्या उमेदवारांनी स्वतंत्रपणे अर्ज ऑनलाईन सादर करणे आवश्यक आहे . |
| १.११ | प्रस्तुत जाहिरातीस अनुसरून अर्ज सादर करण्यासाठी विहित केलेल्या अंतिम दिनांका स संबंधित शैक्षणिक अर्हता धारण करणे आवश्यक आहे. |
| १.१२ | अनुभवाच्या कालावधीची गणना प्रस्तुत जाहिरातीस अनुसरून अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास पूर्ण केलेली असावी. तसेच महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग यांचे परिपत्रक क्रमांक: एसआरव्ही-२००४/प्र.क्र.१०/०४/१२, दिनांक ०३ जुलै २००४ अन्वये अनुभवाच्या कालावधीची गणना करतांना अल्प कालावधीची किंवा तासिका तत्वावर, अतिरिक्त कार्यभार, प्रशिक्षण अभ्यागत किंवा अंशदानात्मक अशा स्वरुपाचे काम केलेल्या उमेदवांना जर ते काम पूर्ण वेळ केलेले नसेल तर तो अनुभव नियुक्तीसाठी असल्याचे गृहीत धरणे योग्य होणार नाही, त्यामुळे या प्रश्नाचा सर्वकष विचार करुन शासन आदेशानुसार सरळसेवेने नियुक्तीसाठी उमेदवाराच्या अनुभवाच्या कालावधीची गणना करतांना रोजंदारी, कार्यव्ययी, करारपध्दतीवर, मानधन इत्यादी स्वरुपात केवळ पूर्णवेळ काम केले असल्यासच असा कालावधी नियुक्तीसाठी विहित केलेल्या अनुभवासाठी ग्राहय धरण्यात येईल. मात्र तासिका (on hour basis), नियतकालीक (periodical), अंशकालीन (part timc), विद्यावेतन (on stipend), अभ्यागत (visiting), अंशदानात्मक (contributory), विनावेतन (without pay) तत्त्वावर केलेल्या अंशकालीन सेवेचा कालावधी, तसेच प्रभारी (incharge) म्हणून नेमणुकीचा कालावधी, अतिरिक्त कार्यभाराचा (additional charge) कालावधी अनुभवासाठी ग्राहय धरण्यात येणार नाही. ज्या पदांसाठी खाजगी संस्थां चा अनुभव निश्चित केलेला आहे . अशा खाजगी संस्था प्रचलित शासकिय धोरण / नियम यानुसार नोंदणीकृत असाव्यात. |
| १.१३ | नोंदणी व अर्ज भरण्याची प्रक्रिया उमेदवाराने स्वतः करणे आवश्यक आहे. |
| १.१४ | अर्ज मराठी व इंग्रजीमध्ये उपलब्ध करुन देण्यात आला असला, तरी संगणक प्रक्रियेकरिता अर्ज इंग्रजीमध्ये भरणे आवश्यक आहे. संक्षिप्तपणे (Abbreviations) वा अद्याक्षरे (Initials) न देता संपूर्ण नाव व संपूर्ण पत्ता नमूद करावा. नावाच्या / पत्त्याच्या दोन भागांमध्ये एक स्पेसने (जागा) सोडावी. |
| १.१५ | एस.एस.सी. अथवा तत्सम प्रमाणपत्रांवरील नावाप्रमाणे अर्ज भरावेत त्यानंतर नाव बदलले असल्यास अथवा प्रमाणपत्रावरील नावात कोणत्याही प्रकारचा बदल झाला असल्यास, त्यासंबंधीच्या बदला संदर्भातील विहित प्रमाणपत्रे/कागदपत्रे पडताळणीच्या वेळी सादर करावी. |

Mahabharti.in

| | |
|---|---|
| १.१६ | उमेदवाराने शाळा सोडल्याचा दाखला, जन्मदाखला, अधिवास प्रमाणपत्र, अर्हतेमध्ये नमूद केलेले विहित शैक्षणिक अर्हतेबाबतची गुणपत्रके व प्रमाणपत्रे, संगणक तसेच मागासवर्ग उमेदवारांनी सक्षम अधिका-याने दिलेले जात प्रमाणपत्र, जात वैधता प्रमाणपत्र, आणि अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्ग वगळता अन्य सर्व मागास प्रवर्गातील उमेदवारांनी ते उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे नवीनतम प्रमाणपत्र, इत्यादी सर्व कागदपत्रांच्या मूळ प्रती व साक्षांकित प्रती, तसेच उमेदवाराची समांतर आरक्षणांतर्गत निवड झाली असल्यास, शासन निर्णयानुसार विहीत प्रमाणपत्रांच्या साक्षांकीत प्रती सादर करणे आवश्यक असेल. |
| १.१७ | संबंधित पदाच्या / परीक्षेच्या जाहिरात / सूचनेमध्ये दिलेल्या सर्व सूचनांचे काळजीपूर्वक अवलोकन करुनच अर्ज सादर करावा. अर्जामध्ये दिलेल्या माहितीच्या आधारेच पात्रता आजमावली जाईल व त्याच्या आधारे निवड प्रक्रिया पूर्ण होईल. |
| १.१८ | महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्रमांकः मकसी-१००७/प्र.क्र.३६/का.३६, दिनांक १० जुलै २००८ अन्वये महाराष्ट्र-कर्नाटक सिमा भागातील महाराष्ट्र शासनाने दावा सांगितलेल्या ८६५ गावातील मराठी भाषिक उमेदवारांना संबंधित पदांच्या सेवाभरती नियमातील सर्व अर्टीची पूर्तता ते करीत असल्यास त्यांना महाराष्ट्र शासनाच्या सेवेतील पदांवर नियुक्तीसाठी अर्ज करता येतील. |
| १.१९ | पंधरा वर्षे सैनिकी सेवा झालेले माजी सैनिक यांची शैक्षणिक अर्हता ही महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक :- आरटीए-१०८२/२३२७/सीआर-६३/१६-अ, दिनांक ०५ ऑक्टोंबर १९८९ नूसार असेल. |
| १.२० | सदरील जाहि रातील नमुद केलेल्या काही अटीशर्ती दि .०३ नोव्हेंबर २०२५ रोजी शासनास सादर केलेल्या प्रस्तावाच्या मान्यतेच्या अधिन राहुन प्रसिध्द करण्यात येत आहे. |
| १.२१ | संबंधित पदाच्या / परीक्षेच्या जाहिरात / सूचनेमध्ये दिलेल्या सर्व सूचनांचे काळजीपूर्वक अवलोकन करुनच अर्ज सादर करावा. अर्जामध्ये दिलेल्या माहितीच्या आधारेच पात्रता आजमावली जाईल व त्याच्या आधारे निवड प्रक्रिया पुर्ण होईल. |
| १.२२ | सदर पदांसाठी विशिष्ठ शारिरीक अर्हता निश्चित केलेली असल्याने दिव्यांग आरक्षणासाठी कोणतीही जागा निश्चित करण्यात आलेली नाही. |

## २. वयोमर्यादा / वयोमर्यादा शिथिलता :-

| | |
|---|---|
| **२.१** | महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार-ब, सप्टेंबर २८,२०२२/ आश्विन ६, शके १९४४ |
| **२.२** | ज्या पदांसाठी सेवाप्रवेश नियमांतच वयोमर्यादेची अट निश्चित केली असेल तर त्या पदांसाठी सदर अटीनुसार वयोमर्यादा निश्चित होईल. |

| वयोमर्यादा गणण्याचा दिनांक | किमान वयोमर्यादा खुला / मागासवर्गीय / आ.दु.घ. | कमाल वयोमर्यादा | | प्राविण्या प्राप्त खेळाडु खुला / मागासवर्गीय / अनाथ/ आ.दु.घ. | माजी सैनिक, भूकंपग्रस्त, प्रकल्पग्रस्त कमाल मर्यादा | पदवीधर अंशकालीन उमेदवार कमाल वयोमर्यादा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | अराखीव खुला | मागासवर्गीय / अनाथ/ आ.दु.घ. | | | |
| अर्ज स्विकृतीच्या अंतिम दिनांक | १८ | २८ | ३३ | ३३ | ३३ | ३३ |

**टिप : -**

- **उपरोक्त नमूद वयोमर्यादा ही अर्ज स्विकृतीच्या अंतिम दिनांकास विचारात घेतली जाईल.**

## ३. पदसंख्या व आरक्षणांसंदर्भात सर्वसाधारण तरतूदी :-

| | |
|---|---|
| **३.१** | भरावयाच्या उपरोक्त संवर्ग पदांचे सामाजि क / समांतर आरक्षण तसेच वर नमूद केलेली पदसंख्या व आरक्षणामध्ये बदल होण्याची शक्यता आहे. |
| **३.२** | पदसंख्या व आरक्षणामध्ये बदल झाल्यास याबाबतची माहिती / वदल वेळोवेळी नाशिक महानगरपालिकेच्या www.nmc.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल व त्यानुसार भरती प्रक्रिया राबविण्यात येईल. |
| **३.३** | महिला, खेळाडू, अनाथ, माजी सैनिक, भूकंपग्रस्त, अंशकालीन, प्रकल्पग्रस्त यांसाठीचे समांतर आरक्षण शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमत केलेल्या आदेशानुसार राहील. |

| | |
|---|---|
| ३.४ | महाराष्ट्र शासन, महिला व बाल विकास विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र.महिला २०२२/प्र.क्र.१२३/कार्या-२, दिनांक ०४ मे, २०२३ अन्वये खुला प्रवर्ग तसेच अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वगळता अन्य मागास प्रवर्गातील महिलांकरीता आरक्षित असलेल्या पदावरील निवडीसाठी दावा करू इच्छिणा -या महिलांना त्या त्या मागास प्रवर्गासाठी इतर मागास व बहुजन कल्याण विभाग तसेच सामान्य प्रशासन विभागाकडून वेळोवेळी विहीत करण्यात आल्याप्रमाणे नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. |
| ३.६ | महिलांसाठी आरक्षित पदाकरीता दावा करणाऱ्या उमेदवारांनी महिला आरक्षणाचा लाभ घ्यावयाचा असल्यास त्यांनी महाराष्ट्राचे अधिवासी (Domiciled) असल्याबाबत तसेच अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वगळून इतर सर्व मागास प्रवर्गातील महिलांसाठी नॉन-क्रिमिलेअर मध्ये मोडत असल्याबाबतचा स्पष्टपणे दावा करणे आवश्यक आहे. |
| ३.७ | विमुक्त जाती (अ) भटक्या जमाती (ब) भटक्या जमाती (क) व भटक्या जमाती (ड) प्रवर्गासाठी आरक्षित असलेली पदे आंतरपरिवर्तनीय असून आरक्षित पदासाठी संबंधित प्रवर्गातील योग्य व पात्र उमदेवार उपलब्ध न झाल्यास अद्यावत शासन धोरणाप्रमाणे उपलब्ध प्रवर्गातील उमेदवाराचा विचार गुणवत्तेच्या आधारावर करण्यात येईल. |
| ३.८ | अर्ज करताना एखादी जात / जमात राज्य शासनाकडून आरक्षणासाठी पात्र असल्याचे घोषित केली असल्यास तसेच सक्षम प्राधिकाऱ्याने प्रदान केलेले प्रमाणपत्र उमेदवारांकडे उपलब्ध असेल तर संबंधित जात/जमातीचे उमेदवार आरक्षणाच्या दाव्यासाठी पात्र असतील. |
| ३.९ | समांतर आरक्षणाबाबत शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही- १०१२/प्र.क्र.१६/१२/१६-अ, दिनांक १३ ऑगस्ट, २०१४ तसेच शासन शुध्दीपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक संकीर्ण- १११८/प्र.क्र.३८/१६-अ, दिनांक १९ डिसेंबर, २०१८ आणि तद्नंतर शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल. |
| ३.१० | आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांतील (ईडब्ल्युएस) उमेदवारांकरीता शासन निर्णय , सामान्य प्रशासन विभाग , क्र.राआधो-४०१९/प्र.क्र.३१/१६/-अ, दि.१२/०२/२०१९ व दि .३१/०५/२०२१ अन्वये विहीत करण्यात आलेले प्रमा णपत्र सादर करणे आवश्यक राहील. |
| ३.११ | शासन शुध्दीपत्रक, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, क्रमांक : संकीर्ण-२०२३/प्र.क्र.७६/मावक, दिनांक ९ मार्च, २०२३ अन्वये शासनाकडून जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार संबंधित उमेदवार उन्नत आणि प्रगत व्यक्ती/गटात मोडत नसल्याबाबतची पडताळणी करण्यासाठी सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षाचे उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य राहील. |
| ३.१२ | नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र अद्यावत असावे तसेच ते सक्षम प्राधिकाऱ्याने वितरित केलेले व अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास वैध असणारे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. |
| ३.१३ | सेवा प्रवेशाच्या प्रयोजनासाठी शासनाने मागास म्हणून मान्यता दिलेल्या समाजाच्या वयोमर्यादेमध्ये सवलत घेतलेल्या उमेदवारांचा अराखीव (खुला) पदावरील निवडीकरीता विचार करणेबाबत शासनाच्या धोरणानुसार कार्यवाही करण्यात येईल. |
| ३.१४ | अराखीव (खुला) उमेदवारांकरीता विहित केलेल्या वयोमर्यादा तसेच इतर पात्रता विषयक निकषांसंदर्भातील अटींची पूर्तता करणा -या सर्व उमेदवारांचा (मागासवर्गीय उमेदवारांसह) अराखीव (खुला) सर्वसाधारण पदावरील शिफारसीकरीता विचार होत असल्याने , सर्व आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांनी त्यांच्या प्रवर्गासाठी पद आरक्षित / उपलब्ध नसले तरी, अर्जामध्ये त्यांच्या मूळ प्रवर्गासंदर्भातील माहिती अचूकपणे नमूद करणे बंधनकारक आहे. |
| ३.१५ | महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन परिपत्रक सीबीसी- १०/२०१०/प्र.क्र.४७/मावक-५, दिनांक २६ मार्च २०१० अन्वये कोणत्याही प्रकारच्या आरक्षणाचा (सामाजिक अथवा समांतर) अथवा सोयी सवलतींचा दावा करणाऱ्या उमेदवाराकडे संबंधित कायदा / नियम / आदेशानुसार विहित नमुन्यातील प्रस्तुत जाहिरातीस अनुसरुन अर्ज स्वीकारण्यासाठी विहित केलेल्या दिनांकापूर्वीचे जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध असणे अनिवार्य आहे. ज्या उमेदवारांकडे जात वैधता प्रमाणपत्र नसेल आणि उमेदवार नियुक्तीस पात्र झाला असेल, अशा उमेदवारांने त्याच्या जाती दाव्या प्रित्यर्थ आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता एक महिन्याच्या आत नाशिक महानगरपालिका प्रशासनाकडे करावी. कागदपत्रांची पूर्तता झाल्यानंतर तात्काळ जाती प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे कागदपत्रे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात येतील. संबंधित उमेदवाराच्या जातीचा दावा वैध असल्याबाबतचा समितीचा निर्णय प्राप्त झाल्यानंतर संबंधित उमेदवारास नियुक्ती आदेश देण्यात येतील. जात पडताळणी समितीकडून ३ महिन्याचे आत जात पडताळणी प्रमाणपत्र प्राप्त होणे अपेक्षित आहे. ३ महिन्यापेक्षा जास्त कालावधी लागल्यास संबंधित उमेदवार नियुक्तीस पात्र नाही, असे संबोधण्यात येईल. |
| ३.१६ | सामाजिक व समांतर आरक्षणासंदर्भात विविध न्यायालयामध्ये दाखल न्यायप्रविष्ट प्रकरणी अंतिम निर्णयाच्या अधीन राहून पदभरतीची कार्यवाही करण्यात येत आहे. |
| ३.१७ | जातीच्या दाव्याच्या पृष्ठ्यर्थ महाराष्ट्र अनुसूचित जाती , अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास वर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्यांच्या पडताळणीचे विनियम ) अधिनियम २००० मधील तरतुदीनूसार सक्षम प्राधिकारी यांचे |

Mahabharti.in

| | |
|---|---|
| | कडून प्रदान करण्यात आलेले जातीचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. |
| ३.१८ | विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), विषेश मागास प्रवर्ग व इतर मागासवर्गाचा दावा करणाऱ्या (या प्रवर्गातील महिला, खेळाडू, माजी सैनिक, अपंग, अंशकालीन कर्मचारी, स्वातंत्र्यसैनिकांचे पाल्य, प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त या समांतर आरक्षणाचा दावा करणाऱ्या) उमेदवारांनी उन्नत व प्रगत गटामध्ये मोडत आहेत किंवा नाही याबाबत अर्जामध्ये स्पष्टपणे नमूद करणे आवश्यक आहे. |
| ३.१९ | महाराष्ट्र राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागासवर्गाकरिता आरक्षण अधिनियम , २०२४ च्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने दयावयाचे जात प्रमाणपत्र आणि नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र प्रदान करण्याबाबत मार्गदर्शक सुचना दि .११ मार्च, २०२४ तसेच दिनांक २६ फेब्रुवारी २०२४ नुसार पालन करावे . तसेच राज्यातील नाशिक या आदिवासी बहुल जिल्हयांमध्ये जिल्हास्तरीय गट -क व गट -ड संवर्गातील पदांसाठी सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास वर्गाच्या (एसईबीसी) आरक्षणासह सुधारित आरक्षण दि .२९ जुलै, २०२५ व दि.२३ सप्टेंबर, २०२५ अन्वये निश्चित केलेले आहे. |

## ४. खेळाडू आरक्षण :-

| | |
|---|---|
| ४.१ | शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांकः राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक १ जुलै २०१६, तसेच शासन शुध्दीपत्रक, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक: राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक १८ ऑगस्ट, २०१६, शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक: संकीर्ण-१७१६/प्र.क्र.१८/क्रीयुसे-२, दिनांक ३० जून २०२२ आणि तद्नंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार प्राविण्य प्राप्त खेळाडू आरक्षणासंदर्भात तसेच वयोमर्यादेतील सवलतीसंदर्भात कार्यवाही करण्यात येईल. |
| ४.२ | प्राविण्य प्राप्त खेळाडू व्यक्तींसाठी असलेल्या आरक्षणाचा दावा करणाऱ्या उमेदवारांच्या बाबतीत क्रीडा विषयक विहित अर्हता धारण करीत असल्याबाबत सक्षम प्राधिकाऱ्याने प्रमाणित केलेले पात्र खेळाचे प्राविण्य प्रमाणपत्र अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकाचे किंवा तत्पूर्वीचे असणे बंधनकारक आहे. |
| ४.३ | खेळाचे प्राविण्य प्रमाणपत्र योग्य दर्जाचे असल्याबाबत तसेच तो खेळाडू उमेदवार खेळाडूसाठी आरक्षित पदावरील निवडीकरीता पात्र ठरतो, याविषयीच्या पडताळणीकरीता त्यांचे प्राविण्य प्रमाणपत्र संबंधित विभागीय उपसंचालक कार्यालयाकडे अर्ज सादर करण्याच्या दिनांकापूर्वीच सादर केलेले असणे बंधनकारक आहे. अन्यथा प्राविण्य प्राप्त खेळाडूसाठी आरक्षणाकरीता पात्र समजण्यात येणार नाही. |
| ४.४ | कागदपत्रे पडताळणी/मुलाखतीच्यावेळी खेळाडू उमेदवारांनी विहित अर्हता धारण करीत असल्याबाबत सक्षम प्राधिकाऱ्याने प्रमाणित केलेले प्राविण्य प्रमाणपत्र तसेच त्यांचे प्राविण्य प्रमाणपत्र योग्य असल्याबाबत तसेच खेळाडू कोणत्या संवर्गातील खेळाडूसाठी आरक्षित पदावरील निवडीकरीता पात्र ठरतो, याविषयीचा सक्षम प्राधिकाऱ्याने प्रदान केलेले प्राविण्य प्रमाणपत्र पडताळणीबाबतचा अहवाल सादर केला तरच उमेदवाराचा संबंधित संवर्गातील खेळाडूसाठी आरक्षित पदावर शिफारसी नियुक्तीकरीता विचार करण्यात येईल. |
| ४.५ | एकापेक्षा जास्त खेळांची प्राविण्य प्रमाणपत्रे असणाऱ्या खेळाडू उमेदवाराने एकाच वेळेस सर्व खेळांची प्राविण्य प्रमाणपत्रे प्रमाणित करण्याकरीता संबंधित उप संचालक कार्यालयाकडे सादर करणे बंधनकारक आहे. |

## ५. अनाथ आरक्षण:-

| | |
|---|---|
| ५.१ | अनाथ व्यक्तीचे आरक्षण शासन निर्णय, महिला व बालविकास विभाग, क्रमांकः अनाथ-२०२२/प्र.क्र.१२२/का-०३, दिनांक ६ एप्रिल, २०२३ तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात येणाऱ्या आदेशानुसार राहील. |
| ५.२ | अनाथांसाठी आरक्षित पदावर गुणवत्तेनुसार निवड झालेल्या उमेदवारांचा समावेश उमेदवार ज्या सामाजिक प्रवर्गाचा आहे. त्या प्रवर्गातून करण्यात येईल. |
| ५.३ | प्रस्तुत पदासाठी अर्जाद्वारे अनाथ आरक्षणाचा दावा केलेल्या उमेदवारांनी दिनांक २३ ऑगस्ट, २०२१ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे विहित करण्यात आलेल्या कार्यपद्धतीनुसार सुधारित नमुन्यातील अनाथ प्रमाणपत्र व महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र आयोगाकडून निश्चित करण्यात येणाऱ्या विहित कालावधीत सादर करणे आवश्यक राहील. अन्यथा अनाथ आरक्षणाचा दावा विचारात घेतला जाणार नाही. |
| ५.४ | अनाथ व्यक्तीसाठी असलेली पदे भरावयाच्या एकूण पदसंख्येच्या १% असतील. |
| ५.५ | महाराष्ट्र शासन, महिला व बाल विकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक - अनाथ-२०१८/ प्र.क्र.१८२/का-०३, दि. २० ऑगस्ट, २०१९ अन्वये अनाथ संवर्गामधील उमेदवारांना मागासवर्गीय प्रमाणे वय व फी मध्ये सवलत देण्यात येईल. |
| ५.६ | महाराष्ट्र शासन, महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र. अनाथ-२०२२/प्र.क्र.१२२/का-०३, दि.०६ एप्रिल, २०२३ अन्वये, अनाथ प्रवर्गासाठी उपलब्ध जागा संस्थात्मक व संस्थाबाह्य प्रवर्गास विभागून देण्यात येतील. |

Mahabharti.in

## ६. निवड पद्धत :-

<table>
<tr><td>६.१</td><td>जाहिरातीमध्ये नमूद पदास आवश्यक असलेली अर्हता अथवा अनुभव शिथिल केला जाणार नाही.</td></tr>
<tr><td>६.२</td><td>नोंदणी प्रक्रियेनंतर प्रवेशपत्र डाऊनलोड करण्यासाठी एक लिंक विकसित केली जाते. एकदा नाशिक महानगरपालिकेद्वारे लिंक होस्ट केल्यानंतर, उमेदवाराला ई-मेल व मोबाईल क्रमांकावर लघुसंदेशाद्वारे त्याबाबत सूचित केले जाईल. उमेदवार थेट लिंकवरून त्याचे प्रवेशपत्र डाऊनलोड करु शकतात. प्रवेशपत्राबाबत कोणताही वेगळा पत्रव्यवहार केला जाणार नाही.</td></tr>
<tr><td>६.३</td><td>विहीत केलेल्या पदध्दती ने परिपुर्ण अर्ज सादर करणाऱ्या उमेदवारांची संवर्गनिहाय लेखी परिक्षा आयोजित केली जाईल.परीक्षा ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार आहे. परीक्षेचे ठिकाण, दिनांक व वेळ ई-मेल किंवा एस. एम. एस. (SMS) द्वारे संबंधित उमेदवारांना कळविण्यात येईल. तसेच नाशिक महानगरपालिका अधिकृत संकेतस्थळावर www.nmc.gov.in प्रसिद्धीस देऊन माहिती कळविण्यात येईल. त्यामुळे अर्ज सादर करणाऱ्या उमेदवारांनी वेळोवेळी संकेत स्थळास भेट देणे आवश्यक राहील.</td></tr>
<tr><td>६.४</td><td>जाहिरातीस अनुसरुन प्राप्त झालेल्या अर्जाची संख्या वाजवी प्रमाणापेक्षा जास्त असेल आणि अर्ज सादर केलेल्या सर्व पात्र उमेदवारांच्या परीक्षा घेणे सोयीस्कर नसल्यास परीक्षेसाठी उमेदवारांची संख्या मर्यादित करण्याच्या दृष्टीने जाहिरातीत दिलेल्या शैक्षणिक अर्हता आणि / अथवा अनुभव यापेक्षा जादा शैक्षणिक अर्हता / अनुभव किंवा अन्य योग्य निकष यांच्या आधारे निकष निश्चित करुन अंतिम परीक्षेस पात्र उमेदवारांची संख्या मर्यादित करण्यात येईल.</td></tr>
<tr><td>६.५</td><td>उमेदवारांची निवड निव्वळ गुणवत्तेच्या आधारे केली जाईल. गुणवत्ता यादीत अंतर्भाव करण्यासाठी खुल्या प्रवर्गातील उमेदवाराने एकूण गुणांच्या किमान ५० % व मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवाराने एकूण गुणांच्या किमान ४५% गुण प्राप्त करणे आवश्यक आहे.</td></tr>
<tr><td>६.६</td><td>सरळसेवा भरतीकरिता घेण्यात येणाऱ्या लेखी परीक्षेच्या अनुषंगाने उमेदवारांच्या उत्तरपत्रिकांची /उत्तरपुस्तिकांची गुणपडताळणी अथवा फेर तपासणी केली जाणार नाही. अथवा या संदर्भात कोणत्याही प्रकारच्या अभिवेदनावर कार्यवाही केली जाणार नाही याची नोंद घ्यावी.</td></tr>
<tr><td>६.७</td><td>उमेदवार विशिष्ट पदावर नेमणूक होण्यास कितपत योग्य आहे आणि त्याची मानसिक क्षमता किती आहे. ते आजमावणेकरिता परीक्षेच्या वेळी विचारण्यात येणाऱ्या प्रश्नांमध्ये इतर प्रश्नांबरोबरच ज्यासाठी अर्ज केलेला असेल त्या पदाची कर्तव्ये जबाबदा-या उमेदवाराने ज्ञानाच्या ज्या विशिष्ट क्षेत्रातील विशेषज्ञता प्राप्त केली असेल त्या क्षेत्रातील अद्ययावत घडामोडी व त्याला असलेली माहिती आणि जनतेच्या समस्या या संबंधीचे प्रश्न यांचाही समावेश असेल.</td></tr>
<tr><td>६.८</td><td>पात्र ठरणा-या उमेदवारांची संख्या विचारात घेऊन संभाव्य निवड क्षेत्रामध्ये येणाऱ्या उमेदवारांना कागदपत्रे तपासणीकरीता पाचारण करण्यात येईल. त्याबाबतची यादी व वेळापत्रक नाशिक महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल तसेच ई-मेल अथवा मोबाईलवर मेसेजद्वारे कळविण्यात येईल.</td></tr>
<tr><td>६.९</td><td>निवडसूचीतील उमेदवारांची व त्या उमेदवार ने ऑनलाईन पध्दतीने सादर केलेल्या कागदपत्रांची पडताळणीसाठी (Verification) उमेदवारांने मूळ (Original) कागदपत्रासह प्रत्यक्ष हजर राहणे आवश्यक आहे.</td></tr>
<tr><td>६.१०</td><td>निवडसूची ही प्रवर्ग निहाय तयार करण्यात येईल व त्यामध्ये समाविष्ट करावयाच्या उमेदवारांची संख्या पुढील प्रमाणे असेल.
<table>
<tr><th>प्रवर्ग निहाय रिक्त पदांची संख्या</th><th>निवडसूचीमध्ये समाविष्ट करावयाच्या उमेदवारांची संख्या</th></tr>
<tr><td>१</td><td>३</td></tr>
<tr><td>२ ते ४</td><td>रिक्त पदे अधिक रिक्त पदांच्या १०० टक्के किंवा ५ यापैकी जे अधिक असेल ते.</td></tr>
<tr><td>५ ते ९</td><td>रिक्त पदे अधिक रिक्त पदांच्या ५० टक्के किंवा १० यापैकी जे अधिक असेल ते.</td></tr>
<tr><td>१० ते ४९</td><td>रिक्त पदे अधिक रिक्त पदांच्या ३० टक्के किंवा १५ यापैकी जे अधिक असेल ते.</td></tr>
<tr><td>५० किंवा याहुन अधिक</td><td>रिक्त पदे अधिक रिक्त पदांच्या २५ टक्के</td></tr>
</table>
वरीलप्रमाणे अतिरीक्त उमेदवारांच्या संख्येची परिगणना करताना उमेदवारांची संख्या अपुर्णांकात येत असल्यास पुढील संख्या विचारात घेण्यात येईल.</td></tr>
<tr><td>६.११</td><td>परिक्षेनंतर पात्र उमेदवारांना मिळालेल्या गुणांची यादी नाशिक महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.</td></tr>
<tr><td>६.१२</td><td>पात्र ठरलेल्या प्रत्येक उमेदवाराला त्याने रजिस्टर्ड केलेल्या ई-मेल व मोबाईल क्रमांकावर SMS किंवा E-mail द्वारे</td></tr>
</table>

Mahabharti.in

| | |
|---|---|
| | निवडसूची / प्रतिक्षा यादी व नियुक्ती बाबत कळविण्यात येईल. तसेच नाशिक महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल. |
| **६.१३** | निवड समितीने तयार केलेली निवडसूची १ वर्षासाठी विधीग्राह्य राहील. त्यानंतर ही निवडसूची व्यपगत होईल. |
| **६.१४** | कागदपत्रे पडताळणीसाठी शैक्षणिक अर्हता, अनुभव. जाती प्रमाणपत्र, वयाबाबतचा पुरावा, अधिवास प्रमाणपत्र, इ. बाबतची सर्व मुळ कागदपत्रे व त्याच्या प्रत्येकी दोन स्वसाक्षांकीत प्रतीसह उमेदवाराने उपस्थित राहणे आवश्यक आहे. कागदपत्रे तपासणीचे वेळी उमेदवार शैक्षणिक व इतर अर्हता धारण करीत नसल्याचे आढळुन आल्यास किंवा तपासणीकरिता अपूर्ण कागदपत्रे सादर केल्यास त्यास निवडीसाठी अपात्र करण्यात येईल व त्याबाबत उमेदवाराची कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही. |
| **६.१५** | विहीत कागदपत्रे / प्रमाणपत्र तपासणीकरीता येतेवेळी अर्जासोबत जोडलेल्या दस्तऐवजांच्या मूळ प्रती व त्याची स्वसाक्षांकित (Self Attested) छायांकित प्रत सोबत आणणे अनिवार्य आहे. तसेच स्वतःच्या ओळखीच्या पुराव्यासाठी अर्जासोबत जोडलेला ओळखीचा पुरावा व स्वतःचे आधार कार्ड व त्याची स्वसाक्षांकित (Self Attested) छायांकित प्रत सोबत आणणे अनिवार्य आहे. |
| **६.१६** | कागदपत्रे तपासणीअंती निवड यादी व प्रतिक्षायादी नाशिक महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. |
| **६.१७** | शासन निर्णय प्रतिम १२२२/ प्र.क्र.५४/का.१३,-अ, दि.०४/०५/२०२२ अन्वये वरील गट -क व गट -ड च्या पदांसाठी मौखिक परीक्षा घेतली जाणार नाही. |

## ७. समान गुण धारण करणाऱ्या उमेदवारांची प्राधान्य क्रमवारी :

| | |
|---|---|
| **७.१** | आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या पाल्यास प्रथम प्राधान्य राहील. |
| **७.२** | समान गुण प्राप्त उमेदवारांमध्ये आत्महत्याग्रस्त शेतक-याचा पाल्य नसेल अथवा वरील अनु क्र. (१०.१) नुसार एका पेक्षा अधिक उमेदवार समान गुण प्राप्त करीत असतील तर त्यापैकी वयाने जेष्ठ असलेल्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल. |
| **७.३** | अनु क्र. (७.१) व (७.२) या दोन्ही अटींमध्ये देखील समान ठरत असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत, अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास उच्चतर शैक्षणिक अर्हता (पदव्युत्तर पदवीधर, पदवीधर, उच्च माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण, माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण अशा प्रकारे) धारण करणाऱ्या उमेदवारास प्राधान्यक्रम देण्यात येईल. |
| **७.४** | अनु क्र. (७.१), (७.२) व (७.३) या तिन्ही अटींमध्ये देखील समान ठरत असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत, सदर पदाच्या सेवाप्रवेश नियमामध्ये विहित असलेल्या किमान शैक्षणिक अर्हतेमध्ये उच्चतर गुण प्राप्त उमेदवारास प्राधान्यक्रम देण्यात येईल. |
| **७.५** | सेवा प्रवेश नियम / जाहिरात/ अधिसूचनेमध्ये अनुभव विहित केल्याप्रमाणे, अर्ज स्विकारणाच्या अंतिम दिनांकास धारण करीत असलेल्या विहित अनुभवाचा कालावधी विचारात घेण्यात येईल. |
| **७.६** | वरील निकष लावूनही उमेदवारांचा गुणवत्ताक्रम समान येत असल्यास अशा उमेदवारांचा गुणवत्ताक्रम त्यांच्या आडनावाच्या आद्याक्षरानुसार निश्चित करण्यात येईल. |
| **टीप :-** | आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याचा पाल्य म्हणजे शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र. एससीवाय १२२०५/प्र.क. १८९/म-७. दिनांक २३ जानेवारी २००६ अन्वये गठीत करण्यात आलेल्या जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समितीने ज्या कुटुंबास शेतकऱ्याच्या आत्महत्याप्रकरणी मदतीसाठी पात्र ठरविले असेल अशा कुटुंबातील मृत शेतकऱ्याचा पाल्य (पत्नी /मुलगा/मुलगी) होय. |

## ८. अर्ज, अर्हता इत्यादी :-

| | |
|---|---|
| **८.१** | नाशिक महानगरपालिकेच्या www.nmc.gov.in या अधिकृत संकेतस्थळावरुन ऑनलाईन भरलेल्या अर्जाशिवाय अन्य कोणत्याही प्रकारे भरलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत. तसेच अर्ज स्विकारण्यासाठी विहित केलेल्या अंतिम दिनांक व वेळेनंतर अर्ज करण्याची कार्यप्रणाली बंद होईल. अन्य प्रकारे अर्ज करू नयेत. |
| **८.२** | महाराष्ट्र शासन, केंद्र शासन, स्थानिक स्वराज्य संस्था आणि इतर सेवेत असलेल्या उमेदवारांनी विहित नमुन्यातील अर्ज ऑनलाईन पध्दतीने सादर करावा. त्याचवेळी त्यांनी ज्या पदासाठी अर्ज केला असेल, त्या पदाचे नाव, जाहिरातीचा संदर्भ व अर्ज स्विकारण्यासाठी विहित केलेला अंतिम दिनांक इ. तपशील आपल्या विभाग/कार्यालय प्रमुखांना कळवावा आणि आपला अर्ज विचारात घेतला जाण्यास कोणताही आक्षेप असल्यास, अर्ज स्विकारण्याच्या अखेरच्या दिनांकापासून ३० दिवसाच्या आत महापालिका आयुक्त नाशिक महानगरपालिका यांना परस्पर कळविणेची विनंती आपल्या विभाग/कार्यालय प्रमुखांना करावी. |

## ९. अर्ज भरणे व सादर करणेबाबत आवश्यक सूचना :-

| | |
|---|---|
| **९.१** | उमेदवारांनी अर्ज भरण्यापूर्वी www.nmc.gov.in या वेबसाईटवर जाऊन जाहिरात सविस्तर अभ्यासावी व नंतरच आपला अर्ज भरावा. |
| **९.२** | उमेदवारास अर्ज सादर करताना काही तांत्रिक समस्या उद्भवल्यास संपर्कासाठी आवश्यक असलेला हे ल्पलाईन क्रमांक |

अर्ज सादर करण्यासाठी उपलब्ध होणाऱ्या ऑनलाईन लिंक सुरु होण्यापुर्वी www.nmc.gov.in या वेबसाईटवर स्वतंत्र पणे प्रसिध्द करण्यात येईल याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

**९.३ ऑनलाईन अर्ज सादर करण्याचे वेळापत्रक**

उमेदवारास ऑनलाईन पध्दतीने अर्ज व ऑनलाईन पध्दतीने परीक्षा शुल्क भरण्यासाठी पुढीलप्रमाणे कालावधी उपलब्ध असेल.

| अ.क्र. | तपशील | दिनांक / वेळ |
|---|---|---|
| १ | ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्यासाठी व ऑनलाईन पध्दतीने परीक्षा शुल्क भरण्यासाठी लिंक सुरु होण्याचा दिनांक व वेळ | दिनांक १०/११/२०२५<br>वेळ :- १४.०० |
| २ | ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्यासाठी व ऑनलाईन पध्दतीने परीक्षा शुल्क भरण्यासाठी अंतिम दिनांक व वेळ | दिनांक ०१/१२/२०२५<br>वेळ :- २३.५९ |

- ऑनलाईन अर्जासोबत ऑनलाईन पध्दतीने भरलेले परीक्षा शुल्क कोणत्याही परिस्थितीत उमेदवारास परत केले जाणार नाही. ऑनलाईन शुल्क भरताना बँकेचे इतर शुल्क उमेदवाराला स्वतः भरावे लागतील, ऑनलाईन परीक्षेच्यावेळी रादर ई-पावतीची छायांकीत प्रत प्रवेशासोबत सादर करणे आवश्यक आहे.
- परीक्षा शुल्क ना परतावा (Non Refundable) आहे.
- कोणत्याही कारणास्तव पदभरती प्रक्रिया स्थगित/रद्द झाल्यास उमेदवारास पदभरती शुल्क परत करण्यात येणार नाही.

**९.४** अर्जात हेतूपुरस्पर खोटी माहिती देणे किंवा खरी माहिती दडवून ठेवणे किंवा त्यात बदल करणे किंवा पाठविलेल्या दाखल्यांच्या नोंदीत अनधिकृतपणे खाडाखोड करणे किंवा खाडाखोड केलेले वा वनावट दाखले सादर करणे, परीक्षा कक्षात गैरवर्तन करणे, परीक्षेच्या वेळी नक्कल (Copy) करणे, वशिला लावण्याचा प्रयत्न करणे यासारखे अथवा परीक्षा कक्षाचे बाहेर अथवा परीक्षेनंतरही गैरप्रकार करणाऱ्या उमेदवारांना गुण कमी करणे, विशिष्ठ किंवा सर्व परीक्षांना वा निवडींना अनर्ह ठरविणे यापैकी प्रकरणपरत्वे योग्य त्या शिक्षा करणेचा तसेच प्रचलित कायदा व नियमांचे अनुषंगाने योग्य ती कारवाई करणेचे अधिकार महापालिका आयुक्त, नाशिक महानगरपालिका यांना राहतील. तसेच विहित केलेल्या अर्हतेच्या अटी शर्ती पूर्ण न करणारा अथवा गैरवर्तणूक करणारा उमेदवार कोणत्याही टप्प्यावर निवड होण्यास अपात्र ठरेल. तसेच निवड झाल्यानंतर देखील सेवा समाप्तीस पात्र ठरेल.

**९.५** वयाच्या पुराव्यासाठी सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेला जन्माचा दाखला, शाळा सोडल्याचा दाखला, माध्यमिक (SSC) परीक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र, वय व अधिवासाबाबत शासनाकडील सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येईल.

**९.६** शैक्षणिक अर्हतेसंदर्भात आवश्यक माहिती दिलेल्या क्रमाने नमूद करावी. संबंधित परीक्षेच्या गुणपत्रकावरील दिनांक हा शैक्षणिक अर्हता धारण केल्याचा दिनांक समजण्यात येईल व त्या आधारे उमेदवाराची पात्रता ठरविण्यात येईल.

**९.७** गुणांऐवजी श्रेणी पध्दत असल्यास गुणपत्रकासोबत श्रेणीची यादी सादर करावी.

**९.८** ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याची सर्वसाधारण प्रक्रिया खालीलप्रमाणे आहे.

१) प्रोफाईल निर्मिती / प्रोफाईल अद्ययावत करणे.
२) अर्ज सादरीकरण.
३) शुल्क भरणा.

**९.९ प्रोफाईल निर्मिती / प्रोफाईल अद्ययावत करणे.**

१) नाशिक महानगरपालिकेच्या www.nmc.gov.in या संकेतस्थळावर वापरकर्त्याने प्रोफाईल करण्याकरीता नवीन, वापरकर्त्यांची नोंदणी वर क्लिक केल्यानंतर यंत्रणा लॉग-इन पृष्ठ प्रदर्शित करेल. नवीन खाते (वापरकर्त्याचे नाव login व password) निर्माण करण्यासाठी लॉग-इन पृष्ठाद्वारे सर्व माहिती भरुन नोंदणीची प्रक्रिया पूर्ण करावी.

२) प्रोफाईलद्वारे माहिती भरताना उमेदवाराने स्वतःचाच वैध ई-मेल आयडी, वैध मोबाईल क्रमांक व जन्म दिनांक नोंदविणे आवश्यक आहे.


३) उमेदवाराकडे नित्य वापरात असेल असा ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक असणे आवश्यक आहे. तसेच भरती प्रक्रिये दरम्यान पत्र व्यवहार, प्रवेशपत्र आणि इतर माहिती ऑनलाईन देण्यात येणार असल्यामुळे भरती प्रक्रियेच्या संपूर्ण कालावधीमध्ये नोंदणीकृत ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक वैध/कार्यरत राहणे आवश्यक आहे.

४) वरीलप्रमाणे प्रोफाईलची निर्मिती झाल्यानतर वापरकर्त्याने स्वतःचा login व password द्वारे प्रवेश करुन प्रोफाईलमध्ये विचारलेली वैयक्तिक माहिती, संपर्क तपशील, इतर माहिती, शैक्षणिक अर्हता, अनुभव इ. संदर्भातील तपशीलाची अचूक नोंद करावी.

५) फोटो व स्वाक्षरी अपलोड करणे :-

नोंदणीची प्रक्रिया व प्रोफाईलद्वारे विचारलेली माहिती भरून झाल्यानंतर उमेदवाराने स्वतःचे छायाचित्र / फोटो (रुंदी 3.5 सें.मी. x 4.5 सें.मी.) स्वतःची स्वाक्षरी स्कॅन करुन खालीलप्रमाणे अपलोड करावी :-

Mahabharti.in

| | |
|---|---|
| | अ) एका पांढऱ्या स्वच्छ कागदावर विहित आकाराचा फोटो चिकटवावा. फोटोवर स्वाक्षरी करु नये अथवा फोटो साक्षांकित करु नये. वरील सुचनांनूसार फोटो कागदावर व्यवस्थित चिकटवावा. स्टॅपल अथवा पिनिंग'करु नये. फक्त स्कॅनरवर ठेवून थेट स्कॅन करता येईल.<br>आ) फोटोचा आकार खालीलप्रमाणे असणे गरजचे आहे.<br><br>इ) छायाचित्र अर्जाच्या दिनांकाच्या सहा महिन्याहून आधी काढलेले नसावे आणि ते ऑनलाईन परीक्षेच्या वेळी उमेदवाराच्या रुपाशी जुळणारे असावे.<br>ई) विहित आकार/क्षमतेप्रमाणे काळया शाईच्या (बॉल) पेनने स्वच्छ कागदावर स्वाक्षरी करावी. उमेदवाराने स्वत: स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. अन्य कोणत्याही व्यक्तीने स्वाक्षरी केल्यास ती ग्राह्य धरली जाणार नाही.<br>उ) वरीलप्रमाणे विहित आकारातील फक्त फोटो व स्वाक्षरी वेगवेगळी स्कॅन करावी. संपूर्ण पृष्ठे अथवा फोटो व स्वाक्षरी एकत्रित स्कॅन करु नये.<br>ऊ) स्कॅन करुन अपलोड केलेली स्वाक्षरी, प्रवेशपत्र / हजेरीपट तत्सम कारणासाठी वापरण्यात येईल. परीक्षेच्यावेळी प्रत्यक्ष कागदपत्रे तपासणीच्या वेळी व अन्य कोणत्याही वेळी अर्ज भरताना केलेली स्वाक्षरी व फोटो न जुळल्यास उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल अथवा अन्य कायदेशीर कारवाई करण्यात येईल. |
| **९.१०** | **अर्ज नोंदणी :-**<br>१. नाशिक महानगरपालिकेच्या www.nmc.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर जाऊन Apply Online या पर्यायावर क्लिक करा जे एक नवीन स्क्रिन उघडेल.<br>२. अर्ज नोंदणी करण्यासाठी नवीन नोंदणीसाठी येथे क्लिक टॅब निवडा आणि नाव, संपर्क तपशील आणि ईमेल आयडी प्रविष्ठ करा प्रणालीद्वारे तात्पुरता नोंदणी क्रमांक आणि पासवर्ड तयार केला जाईल आणि स्क्रिनवर प्रदर्शित केला जाईल. उमेदवाराने तात्पुरतानोंदणी क्रमांक आणि पासवर्ड नोंदवावा. तात्पुरतानोंदणी क्रमांक आणि पासवर्ड दर्शविणारा ई-मेल आणि लघुसंदेश देखील पाठविला जाईल.<br>३. जर उमेदवार एकाच वेळी अर्ज भरु शकत नसेल, तर तो सेव्ह आणि नेक्स्ट टॅब निवडून आधीच एंटर केलेला डेटा जतन करु शकतो. ऑनलाईन अर्ज सबमिट करण्यापूर्वी उमेदवारांना ऑनलाईन अर्जातील तपशीलांची पडताळणी करण्यासाठी सेव्ह आणि नेक्स्ट सुविधेचा वापर करण्याचा सल्ला देण्यात येत आहे आणि आवश्यक असल्यास त्यात बदल करावा. उमेदवारांनी अर्ज काळजीपूर्वक भरावा आणि अंतिम सबमिशन करण्यापूर्वी ते बरोबर असल्याची खात्री करण्यासाठी तपशीलांची पडताळणी करुन घ्यावी.<br>४. उमेदवारांनी ऑनलाईन अर्जातील तपशील काळजीपूर्वक भरावेत आणि त्याची पडताळणी करावी, कारण पूर्ण नोंदणी बटणावर क्लिक केल्यानंतर कोणताही बदल शक्य होणार नाही/करणे शक्य होणार नाही.<br>५. उमेदवाराचे नाव किंवा त्याचे/तिचे वडील/पती इ. चे नाव अर्जामध्ये बरोबर लिहिलेले यसावे जसे ते प्रमाणपत्रे / गुणपत्रिका/ओळख पुराव्यामध्ये दिसते. कोणताही बदल/तफावत आढळल्यास उमेदवारी अपात्र ठरु शकते.<br>६. तुमचे तपशील सत्यापित करा आणिजन करा आणि पुढील बटणावर क्लिक करुन तुमचा अर्ज जतन करा.<br>७. फोटो आणि स्वाक्षरी स्कॅनिंग आणि अपलोड करण्याच्या मार्गदर्शक तत्वामध्ये दिलेल्या वैशिष्ट्यानूसार उमेदवाराने फोटो आणि स्वाक्षरी अपलोड करण्याची कार्यवाही करावी.<br>८. नोंदणीपूर्वी संपूर्ण अर्जाचे पूर्वावलोकन आणि पडताळणी करण्यासाठी पूर्वावलोकन टॅबवर क्लिक करा.<br>९. आवश्यक असल्यास तपशील सुधारावा आणि छायाचित्रे, स्वाक्षरी आणि इतर तपशील बरोबर असल्याची पडताळणी आणि खात्री केल्यानंतरच नोंदणी पूर्ण वर क्लिक करा.<br>१०. पेमेंट टॅबवर क्लिक करा आणि पेमेंटसाठी पुढे जावे व सबमिट बटणावर क्लिक करावे. |
| **९.११** | **परीक्षा शुल्क भरणे (ऑनलाईन मोड):-**<br>१. डेबिट कार्ड (Rupay/Visa/Master Card/Maestro), क्रेडिट कार्ड, इंटरनेट बँकिंग, IMPS, कॅश कार्ड्स / मोबाईल वॉलेट वापरुन पेमेंट केले जाऊ शकते.<br>२. व्यवहार यशस्वीरित्या पूर्ण झाल्य पर एक ई-पावती तयार होईल. |

Mahabharti.in

| | |
|---|---|
| | ३. ई-पावती तयार न होणे अयशस्वी फी प्रदान दर्शविते.<br>४. उमेदवारांनी ई-पावती आणि तपशील असलेल्या ऑनलाईन अर्जाची प्रिंटआऊट घेणे आवश्यक आहे. |
| ९.१२ | **स्कॅनिंग आणि कागदपत्रे अपलोड करण्यासाठी मार्गदर्शक तत्वे.**<br>ऑनलाईन अर्ज करण्यापूर्वी उमेदवाराने खाली दिलेल्या वैशिष्ट्यांनुसार त्याचा/ तिचा फोटो, स्वाक्षरी असणे आवश्यक आहे.<br>**छायाचित्र प्रतिमा: (3.5cmx4.5cm)**<br>• छायाचित्र अलीकडील पासपोर्ट शैलीचे रंगीत चित्र असणे आवश्यक आहे.<br>• हलक्या रंगाच्या, शक्यतो पांढऱ्या पार्श्वभूमीच्या विरुध्द घेतलेले असावे.<br>• टोपी आणि गडद चष्मा स्वीकार्य नाहीत.<br>• परिमाण २०० x २३० पिक्सेल (प्राधान्य).<br>• फाईलचा आकार २० KB - ५० KB दरम्यान असावा.<br>• स्कॅन केलेल्या प्रतिमेचा आकार ५० KB पेक्षा जास्त नसावा.<br>• ऑनलाईन अर्ज भरताना उमेदवाराला छायाचित्र, स्वाक्षरी अपलोड करण्यासाठी स्वतंत्र लिंक प्रदान केल्या जातील.<br>• संबंधित लिंकवर क्लिक करा. छायाचित्र/स्वाक्षरी अपलोड करा.<br>• तुमचा फोटो, स्वाक्षरी अपलोड केल्याशिवाय तुमचा ऑनलाईन अर्ज नोंदणीकृत होणार नाही.<br>• छायाचित्रातील चेहरा किंवा स्वाक्षरी अस्पष्ट असल्यास उमेदवाराचा अर्ज नाकारला जाऊ शकतो.<br>• उमेदवाराने हे सुनिश्चित केले पाहीजे की छायाचित्र / स्वाक्षरी अपलोड केल्यानंतर ते योग्य आकाराचे व सुस्पष्ट दिसले पाहीजेत तसेच ते योग्यरित्या अपलोड झालेले आहेत. |
| ९.१३ | **स्वाक्षरी**<br>• अर्जदाराने काळ्या शाईच्या पेनने पांढऱ्या कागदावर सही करावी.<br>• परिमाण १४० x ६० पिक्सेल (प्राधान्य)<br>• फाईलचा आकार १० KB – २० KB दर असावा. स्कॅन केलेल्या प्रतिमेचा आकार २० KB पेक्षा जास्त नाही याची खात्री करा. |
| ९.१४ | **कागदपत्रे स्कॅन करणे**<br>• स्कॅनर रेझोल्यूशन किमान २०० dpi वर सेट करा.<br>• रंग true colour सेट करा. |
| ९.१५ | **कागदपत्रे अपलोड करण्याची प्रक्रिया:-**<br>ऑनलाईन अर्ज भरताना उमेदवाराला छायाचित्र, स्वाक्षरी अपलोड करण्यासाठी स्वतंत्र लिंक प्रदान केल्या जातील. संबंधित लिंकवर क्लिक करा "छायाचित्र/स्वाक्षरी अपलोड करा"<br>* तुमचा फोटो, स्वाक्षरी, अपलोड केल्याशिवाय तुमचा ऑनलाईन अर्ज नोंदणीकृत होणार नाही.<br>१. छायाचित्रातील चेहरा किंवा स्वाक्षरी अस्पष्ट असल्यास उमेदवाराचा अर्ज नाकारला जाऊ शकतो.<br>२. ऑनलाईन अर्जामध्ये छायाचित्र / स्वाक्षरी अपलोड केल्यानंतर उमेदवारांनी प्रतिमा स्पष्ट आहेत आणि योग्यरित्या अपलोड केल्या आहे हे तपासावे.<br>३. उमेदवाराने हे सुनिश्चित केले पाहिजे की अपलोड करावयाचा फोटो आवश्यक आकाराचा आहे आणि चेहरा स्पष्टपणे दिसला पाहिजे.<br>टिप:-ऑनलाईन नोंदणी केल्यानंतर उमेदवारांनी त्यांच्या प्रणालीद्वारे तयार केलेल्या ऑनलाईन अर्जाची प्रिंटआऊट घ्यावी. |
| ९.१६ | **अर्ज सादरीकरण:-**<br>सदर अर्ज नाशिक महानगरपालिकेच्या www.nmc.gov.in या संकेतस्थळावर दिनांक १०/११/२०२५, वेळ १४.०० पासून भरणेसाठी उपलब्ध होतील. उमेदवारांनी परीक्षा शुल्क दिलेल्या पेमेंट गेटवेद्वारे ऑनलाईन पध्दतीने अदा करावे. |
| ९.१७ | **परीक्षा शुल्क:-**<br>• खुल्या प्रवर्गाच्या उमेदवारांसाठी रु.१०००/-<br>• मागास प्रवर्गाच्या उमेदवारांसाठी रु ९००/-<br>• परीक्षा शुल्क फक्त ऑनलाईन पध्दतीनेच भरणा करण्यात यावे.<br>• उमेदवारास प्रसिध्द केलेल्या जाहिरातीमधील एकापेक्षा अधिक पदांकरीता अर्ज करावयाचे असल्यास अशा प्रत्येक पदांसाठी स्वतंत्र अर्ज सादर करुन त्यासाठी स्वतंत्र परीक्षा शुल्क भरणे बंधनकारक राहील.<br>• परीक्षा शुल्क ना परतावा (Non-Refundable) आहे. |
| ९.१८ | वरील कार्यपध्दती ही अर्ज करण्याची योग्य पध्दत आहे. याशिवाय दुसऱ्या पध्दतीने केलेले अर्ज हे अवैध ठरविण्यात येतील. |

Mahabharti.in

| | |
|---|---|
| ९.१९ | उमेदवाराने अर्जात स्वत:चे नाव, सामाजिक प्रवर्ग, कोणत्या प्रवर्गातून अर्ज करु इच्छित आहे तो प्रवर्ग, जन्म दिनांक, भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेल आयडी इ. माहिती काळजीपूर्वक भरावी. सदर माहिती चुकल्यास त्यास नाशिक महानगरपालिका जबाबदार राहणार नाही. |
| ९.२० | उमेदवाराने अर्जावर केलेली स्वाक्षरी ही त्यात्त्या प्रवेशपत्रावर / उपस्थिती पत्रकावर एकाच प्रकारची असेल याची दक्षता घ्यावी. तसेच उमेदवाराने ऑनलाईन अर्जावर अपलोड केलेले छायाचित्र वरीलप्रमाणे सर्व ठिकाणी एकच असेल याची दक्षता घ्यावी. |
| ९.२१ | उमेदवाराने ऑनलाईन पध्दतीने सादर केलेल्या अर्जातील तपशिल व ऑनलाईन पध्दतीने सादर केलेली कागदपत्रे/प्रमाणपत्रांच्या आधारे परीक्षेस बसणेस मुभा देण्यात येईल. त्यामुळे उमेदवार संभाव्य निवडसूची क्षेत्रात आला तरी आवश्यक ती शैक्षणिक अर्हता व इतर अर्हता असल्याशिवाय व आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्याशिवाय निवडीस पात्र राहणार नाही. केवळ संभाव्य निवडसूची क्षेत्रात आल्यामुळे उमेदवारास निवडीचा कोणताही हक्क प्राप्त होणार नाही. त्यामुळे उमेदवारांनी पात्रतेच्या अटी अभ्यासूनच अर्ज सादर करावा. |
| ९.२२ | भरती प्रक्रियेच्या संदर्भातील सर्व माहिती व त्याअनुषंगाने होणाऱ्या बदलाबाबतची सर्व माहिती केवळ नाशिक महानगरपालिकेच्या www.nmc.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध होईल. याव्यतिरिक्त कोणत्याही माध्यमाद्वारे भरती प्रक्रियेची माहिती उपलब्ध होणार नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. |
| ९.२३ | वय, शैक्षणिक अर्हता, मागासवर्ग / नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र, महिला, माजी सैनिक, अनाथ, प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त, अंशकालीन कर्मचारी, खेळाडू, अनुभव पात्रता इ. संदर्भात न चुकता अर्जामध्ये स्पष्टपणे / निर्विवादपणे दावा करणे आवश्यक आहे. अर्जातील संबंधित रकान्यात स्पष्टपणे दावा केला नसल्यास, संबंधित दाव्याचा नंतर विचार केला नाणार नाही. उमेदवाराने अर्ज सादर केल्यानंतर त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल करता येणार नाही. |
| ९.२४ | विहित दिनांकानंतर व विहित वेळेनंतर आलेला कोणताही अर्ज संगणकीय प्रणालीमध्ये स्विकृत केला जाणार नाही. |
| ९.२५ | ज्या उमेदवारांनी यापूर्वी त्यांचे नाव रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राकडे, सेवायोजन कार्यालय /समाज कल्याण / आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी / जिल्हा सैनिक बोर्ड इ. कार्यालयात नोंदविलेले आहे, अशा उमेदवारांनी तसेच प्रकल्पग्रस्त, अंशकालीन उमेदवार यांनी देखील स्वतंत्ररित्या अर्ज सादर करणे आवश्यक राहील. |

## १०. परीक्षा शुल्क :-

| गट | आकारण्यात येणारे शुल्क | |
|---|---|---|
| | खुला प्रवर्ग | मागास प्रवर्ग व अनाथ प्रवर्ग |
| गट "क" व गट "ड" | र.रु. १,०००/- | र.रु. ९००/- |

**परिक्षेचे संक्षिप्त स्वरुप पुढील प्रमाणे असेल :-**

| अ. क्र. | पदनाम व श्रेणी | विषय (प्रश्न संख्या) | दर्जा | माध्यम | प्रश्न संख्या | गुण | कालावधी | प्रश्नपत्रिकेचे स्वरूप |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | चालक-यंत्रचालक / वाहचालक (अग्निशमन) (गट-क) | मराठी (१५)<br>सामान्य ज्ञान (१५)<br>बौध्दीक चाचणी (१५)<br>संबंधित विषय (१५) | माध्यमिक शालांत परीक्षा (१० वी) | मराठी | ६० | १२० | ९० मिनिटे | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |
| २ | फायरमन (अग्निशामक) (गट-ड) | मराठी (१५)<br>सामान्य ज्ञान (१५)<br>बौध्दीक चाचणी (१५)<br>संबंधित विषय (१५) | माध्यमिक शालांत परीक्षा (१० वी) | मराठी | ६० | १२० | ९० मिनिटे | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |

**टिप** :-

१) उपरोक्त नमुद तक्त्यातील पदांसाठी उमेदवारांची शारीरिक पात्रता व कार्यक्षमता तपासण्यासाठी ८० गुणांची मैदानी चाचणी घेण्यात येईल. लेखी परीक्षेतील गुणांसह या चाचणीतील गुण एकत्रित करुन अंतिम गुणवत्तेनुसार निवड करण्यात येईल.

२) उपरोक्त पदासाठी घेण्यात येणाऱ्या मैदानी चाचणीची सविस्तर माहिती स्वतंत्र पणे नाशिक मनपाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. यांची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

| | |
|---|---|
| ११.१ | माजी सैनिक यांचेसाठी शुल्क माफ राहील. |
| ११.२ | फक्त ऑनलाईन पध्दतीनेच परीक्षा शुल्क भरावयाचे आहे. |
| ११.३ | परीक्षा शुल्क ना-परतावा (Non- Refundable) आहे. ऑनलाईन शुल्क भरतांना बँकेचे इतर शुल्क उमेदवारास पदभरती शुल्क परत करण्यात येणार नाही. |

Mahabharti.in

| | |
|---|---|
| ११.४ | ऑनलाईन अर्ज करण्याची पध्दत इत्यादी बाबतचा तपशिल व ऑनलाईन अर्ज करण्यासाठी नाशिक महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर भेट देण्यात यावी . तसेच संवर्गनिहाय भरावयाची पदे , पदांचा तपशिल , वेतनश्रेणी, वयोमर्यादा / वयोमर्यादा शिथिलता, निवड पध्दत , सर्वसाधारण सुचना , अटी व शर्ती , शैक्षणिक अर्हता , सामाजिक व समांतर आरक्षण तसे च आरक्षणाबाबत तरतुदी , पदनिहाय ऑनलाईन परीक्षा शुल्क , अर्ज भरणेबाबत मार्गदर्शक सुचना इत्यादी बाबतचा तपशिल www.nmc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. |
| ११.५ | परीक्षेसाठी मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान, संबंधित विषयज्ञान या विषयावर वस्तुनिष्ठ बहुपर्यायी प्रश्न असतील सदर परीक्षेचा दर्जा हा संबंधित पदाकरीता विहित करण्यात आलेल्या किमान शैक्षणिक अर्हतेनुसार तसेच संबंधित पदासाठी आवश्यक असलेल्या कौशल्य तपासणीस पूरक राहील. |
| ११.६ | परीक्षेचे गुण व परीक्षेचा कालावधी हा मागील पानांवरील तक्त्यानुसार असेल. |
| ११.७ | ऑनलाईन परीक्षा ही त्या पदाची शैक्षणिक अर्हता, कामाचे स्वरुप, तांत्रिक ज्ञान यांचेशी संबंधित राहील. |
| ११.८ | जाहिरातीमध्ये नमूद पदाकरिता अर्ज केलेल्या परीक्षेकरीता पात्र ठरलेल्या उमेदवारांचे परीक्षेचे प्रवेशपत्र (Hall Ticket) www.nmc.gov.in या संकेतस्थळावर परीक्षेच्या ७ (सात) दिवस अगोदर त्यांच्या प्रोफाईलद्वारे उपलब्ध करून देण्यात येतील. उमेदवारांनी परीक्षा प्रवेशपत्र स्वत: संकेतस्थळावरून काढून घ्यावे.<br>• परीक्षेच्या वेळी उमेदवाराने प्रवेशपत्राचा प्रिट व ओळखीचा पुरावा (छायाप्रतीसह) सोबत ठेवणे बंधनकारक आहे. त्याशिवाय कोणत्याही उमेदवारांस परीक्षेस बसण्यास परवानगी दिली जाणार नाही. परीक्षेनंतर प्रस्तुत प्रवेशपत्र स्वत:जवळ जपून ठेवावे व परीक्षा कक्षात प्रवेशपत्र व ओळखीच्या पुराव्याची छायाप्रत जमा करावी.<br>• परीक्षा केंद्राची शहरे उपलब्धतेनूसार निश्चित केली जातील. |
| ११.९ | "परीक्षा केंद्र प्रवेश पत्रावर ठरवून दिलेप्रमाणे असतील. अर्जदाराने मागणी केलेल्या केंद्राव्यतिरिक्त अन्य/नवीन केंद्र दिले जाऊ शकते. याबाबत कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही" |
| ११.१० | परीक्षेनंतर आवश्यकतेनुसार संभाव्य निवडसूची क्षेत्रातील उमेदवारांना विहीत प्रमाणात कागदपत्रे /प्रमाणपत्रे पडताळणीकरीता बोलाविण्यात येईल. |
| ११.११ | काही अपरिहार्य कारणास्तव परीक्षेच्या तारखांमध्ये / परीक्षेच्या ठिकाणामध्ये बदल करावा लागल्यास त्याबाबतची माहिती www.nmc.gov.in संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल. याबाबत लेखी स्वरूपात कोणत्याही प्रकारे पत्रव्यवहार केली जाणार नाही. |
| ११.१२ | **ओळख पटवणे :-**<br>परीक्षा केंद्रावर प्रवेशपत्रासह उमेदवाराचे ओळख पटवणारे मूळ कागदपत्रासह व उमेदवाराचा अलीकडच्या काळातील फोटो असलेले वैध फोटो ओळखपत्र जसे पॅन कार्ड (Pan Card) / पारपत्र (Passport)/वाहनचालक परवाना (Driving License) / मतदार ओळखपत्र (Voter ID) / आधार कार्ड, बँक/पोस्ट फोटोसहीतचे पासबुक / शासकीय कर्मचारी ओळखपत्र / विद्यापीठ / कॉलेजचे फोटोसहीत ओळखपत्र/बार कौन्सिलचे ओळखपत्र हे समवेक्षक/पर्यवेक्षकाला सादर करणे आवश्यक आहे. उमेदवाराचे प्रवेशपत्र, हजेरीपत्रक / उपस्थितीपत्रक आणि त्याने सादर केलेल्या कागदपत्रांच्या आधारे उमेदवाराची ओळख पटविली जाईल. जर उमेदवाराची ओळख पटवण्याबाबत काही शंका उपस्थित झाल्यास किंवा ओळख शंकास्पद असल्यास त्याला परीक्षेसाठी उपस्थित राहू दिले जाणार नाही, सदर उमेदवाराचे मूळ प्रवेशपत्र व ओळखपत्राची एक छायाप्रत परीक्षा हॉलमध्ये जमा करणे आवश्यक राहील.<br>**टीप:-** उमेदवाराने परीक्षेला उपस्थित राहताना स्वत:ची ओळख पटविण्यासाठीची आवश्यक ती मूळ कागदपत्रे, त्या कागदपत्रांच्या छायांकीत प्रती परीक्षेच्या प्रवेशपत्रासह सादर करणे आवश्यक आहे. परीक्षेच्या प्रवेशपत्रावरील नाव (परीक्षेसाठी नोंदणी केल्यानुसार) सोबत सादर करण्यात येणा-या ओळखपत्राशी तंतोतंत जुळणे आवश्यक आहे. ज्या महिला उमेदवारांच्या पहिल्या/मधल्या/शेवटच्या नावात विवाहानंतर फरक पडला असेल त्यांनी याबाबत विशेष खबरदारी घेणे आवश्यक आहे. सदर महिला उमेदवारांनी नावात बदल झाल्याबाबतचे विवाह नोंदणी प्रमाणपत्र किंवा राजपत्र यापैकी एक पुरावा सादर करणे आवश्यक आहे. परीक्षेचे प्रवेशपत्र व सादर करण्यात आलेले फोटो असलेले ओळखपत्र यामधील नावात कोणतीही तफावत आढळल्यास उमेदवारास परीक्षेला उपस्थित राहू दिले जाणार नाही. रेशनकार्ड, शिकाऊ वाहन परवाना ओळखपत्र म्हणून ग्राहय धरला जाणार नाही.<br>**निवड प्रक्रिये दरम्यान गैरवर्तणूक / अनुचित प्रकार / गैरप्रकार करताना दोषी आढळलेल्या उमेदवारावर करण्यात येणारी कार्यवाके :-**<br>उमेदवाराने त्याच्या हितासाठी खोटी व चुकीची माहिती / तपशिल देवू नये, खोटी माहिती तथा खोटा तपशिल तयार करून सादर करू नये किंवा कोणतीही माहिती ऑनलाईन अर्ज भरताना दडवून ठेवू नये. जर उमेदवाराने खोटी माहिती तथा खोटा तपशिल तयार करून सादर केला तर उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल व योग्य तो फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल. |
| ११.१३ | **परीक्षेच्या वेळेत किंवा एकूण निवड प्रक्रियेदरम्यान जर उमेदवाराने,**<br>१) अनुचित प्रकार करणे किंवा<br>२) तोतयेगिरी करणे किंवा तोतयांच्या सेवा वापरणे किंवा,<br>३) परीक्षेच्या ठिकाणी गैरवर्तणूक करणे किंवा परीक्षेच्या पेपरमधील माहिती किंवा तत्संबंधी काही माहिती कोणत्याही कारणासाठी पूर्ण किंवा त्याचा काही भाग तोंडी किंवा लेखी किंवा इलेक्ट्रानिकली किंवा मेकॅनिकली उघड करणे, प्रकाशित |

Mahabharti.in

| | |
|---|---|
| | करणे, पाठवणे, साठवणे किंवा,<br>४) स्वतःच्या उमेदवारीबद्दल अनियमित किंवा अयोग्य पद्धतीचा अवलंब करणे किंवा,<br>५) स्वतःच्या उमेदवारीबद्दल गैरमार्गाने पाठिंबा मिळविणे किंवा,<br>६) दळणवळणाची भ्रमणध्वनी किंवा तत्सम इलेक्ट्रॉनिक साधने यांचा वापर परीक्षेच्या ठिकाणी करणे,<br>७) परीक्षा कक्षातील परीक्षा नियंत्रण अधिकारी/पर्यवेक्षक/समावेशक यांच्याशी अरेरावी करणे उद्धटपणे वागणे त्यांना लाच देऊ पाहणे. अशा कृत्यांमध्ये दोषी आढळल्यास अशा उमेदवारास फौजदारी कार्यवाहीस सामोरे जावे लागेल तसेच सदर, उमेदवारास परीक्षेसाठी अपात्र ठरविले जाईल.<br>८) नाशिक महानगरपालिकेतर्फे पुढील कालावधीत घेण्यात येणा-या कोणत्याही परीक्षेसाठी बसण्यापासून काही ठराविक कालावधीसाठी किंवा कायमचे प्रतिरोधित (Debarred) केले जाईल.<br>९) जर उमेदवार नाशिक महानगरपालिकेच्या सेवेत आधीच रूजू झाला असेल तर त्याची सेवा समाप्त केली जाईल. |
| **११.१४** | **महानगरपालिका सेवेतील पदावर नियुक्तीसाठी अनर्हता :**<br>एखाद्या व्यक्तीस :-<br>(क) अधिनियमाच्या कलम ५९ च्या तरतुदीप्रमाणे अनर्ह ठरविण्यात आले असेल.<br>(ख) महापालिकेच्या सेवेतून किंवा कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाच्या सेवेतून किंवा कोणत्याही सरकारी सेवेतून गैरवर्तणुकीबद्दल बडतर्फ करण्यात आले असेल, किंवा<br>(ग) ज्यामध्ये नैतिक अधःपाताचा समावेश होईल अशा अपराधाबद्दल तिला दोषी ठरविण्यात आले असेल, किंवा<br>(घ) जर त्याच्या एकापेक्षा अधिक पत्नी ह्यात असतील आणि स्त्री उमेदवारांच्या बाबतीत जर तिने ज्याची पत्नी ह्यात आहे अशा व्यक्तीशी विवाह केला असेल, किंवा<br>(च) जर तो/ती महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुंटूबाचे प्रतिपादन) नियम, २००५ मधील तरतुदींची पुर्तता करीत नसेल, किंवा<br>(छ) न्यायालयात ज्या गुन्ह्यासाठी कैदेची शिक्षा फर्मावता येते, अशा गुन्ह्यासाठी सहा महिन्याहून अधिक मुदतीची कैदेची शिक्षा झाली असेल व ती शिक्षा अपील वा पुनरिक्षणात रद्द झाली नसेल, अशी व्यक्ती किंवा,<br>(ज) महापालिकेच्या सेवेत असतांना सिध्दापराध होऊन सहा महिन्यांपेक्षा अधिक मुदतीची कैदेची शिक्षा झाली असेल व ती शिक्षा अपील वा पुनरिक्षणात रद्द झाली नसेल,<br>अशी व्यक्ती महापालिकेच्या सेवेत नेमणुक देण्यास वा नेमणुक चालू ठेवण्यास अपात्र समजली जाईल. |

## १२. परीक्षा केंद्राविषयी नियमावली :-

| | |
|---|---|
| १२.१ | प्रवेश पत्रामध्ये नमूद केलेल्या परीक्षा केंद्रावर "ऑनलाईन" पद्धतीने परीक्षा घेतली जाईल. |
| १२.२ | परीक्षा केंद्र, परीक्षेचे ठिकाण, दिनांक, वेळ व सत्र इत्यादी बाबत बदल करण्याची विनंती मान्य केली जाणार नाही. |
| १२.३ | महापालिकेस परीक्षा केंद्र रद्द अथवा नवीन केंद्र समाविष्ट इत्यादी बाबतचे अंतिम अधिकार असतील. |
| १२.४ | महापालिकेस उमेदवाराने मागणी केलेल्या परीक्षा केंद्र व्यतिरिक्त केंद्र देण्याचा अधिकार असेल. |
| १२.५ | उमेदवारांनी आपल्या जबाबदारीवर स्वखर्चाने परीक्षा केंद्रावर उपस्थित राहावयाचे आहे या संबंधात कोणत्याही प्रकारच्या हानी/नुकसानीस महापालिका जबाबदार राहणार नाही. |
| १२.६ | एखादया परीक्षा केंद्रावर पुरेसे उमेदवार "ऑनलाईन" परीक्षेसाठी उपस्थित न राहिल्यास किंवा केंद्रावर क्षमतेपेक्षा अधिक उमेदवार झाल्यास महापालिकेस उमेदवाराचे परीक्षा केंद्र बदलण्याचा अधिकार असेल. |
| १२.७ | परीक्षेच्यावेळी परीक्षा केंद्रात किंवा परीक्षा परीसरात भ्रमणध्वनी, गणकयंत्र (Calculator), आयपॅड तत्सम इलेक्ट्रानिक यंत्रे किंवा इतर संपर्काची साधने सोबत बाळगणेस आणि वापरण्यास सक्त मनाई असेल. |

## १३. परीक्षेला उशिरा येण्याबाबत :-

| | |
|---|---|
| **१३.१** | परीक्षेच्या प्रवेशपत्रात परीक्षेला हजर राहण्यासाठी दिलेल्या वेळेनंतर येणा-या उमेदवारांना परीक्षेला उपस्थित राहू दिले जाणार नाही. प्रवेशपत्रावरील परीक्षेसाठी उपस्थित राहण्याची वेळ ही प्रत्यक्ष परीक्षा सुरू होण्याच्या आधीची असणार आहे. परीक्षेची वेळ जरी १ तास ३० मिनिटे (९० मिनिटे) असली तरी, उमेदवारांना विविध प्राथमिक औपचारीकता पूर्ण करण्यासाठी जसे की- सूचना देणे, ओळख पटवणे, आवश्यक विविध कागदपत्रांची पडताळणी, आवश्यक कागदपत्रे गोळा करणे, इत्यादी, बाबींच्या पुर्ततेसाठी प्रवेशपत्रावर नमूद केलेल्या वेळेच्या किमान १ तास आधी परीक्षा केंद्रावर उपस्थित राहणे बंधनकारक आहे. परीक्षेच्या ३० मिनिटे आधी परीक्षा केंद्रावरील प्रवेश बंद करण्यात येणार असल्यामुळे, त्यानंतर येणाऱ्या उमेदवारांना परीक्षेस बसण्यास परवानगं देण्यात येणार नाही. |

Mahabharti.in

## १३. कागदपत्र पडताळणी वेळेस विहित कागदपत्रे/प्रमाणपत्रे सादर करणे:- :-

सदर परीक्षेच्या निकालानंतर संभाव्य निवडसूची क्षेत्रातील उमेदवारांना कागदपत्रे पडताळणीसाठी आवश्यकतेनुसार खालील कागदपत्रे/प्रमाणपत्रे (लागू असलेली) सादर करणे अनिवार्य आहे.

| | **कागदपत्रे / प्रमाणपत्रे** |
|---|---|
| **१३.१** | अर्जदाराची माहिती बरोबर असल्याचे स्वयंघोषणा पत्र. |
| **१३.२** | शैक्षणिक अर्हतेबाबतची कागदपत्रे. |
| **१३.३** | वयाचा पुरावा. |
| **१३.४** | आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील असल्याबाबतचा पुरावा. |
| **१३.५** | राखीव प्रवर्गातून निवड झालेल्या उमेदवारांचे संबंधित प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र (अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी जात वैधता प्रमाणपत्र अनिवार्य) |
| **१३.७** | वैध नॉन-क्रिमिलेयर प्रमाणपत्र. |
| **१३.८** | पात्र माजी सैनिक असल्याचा पुरावा. |
| **१३.९** | खेळाडूसाठीच्या आरक्षणाकरीता पात्र असल्याचा पुरावा. |
| **१३.१०** | अनाथ आरक्षणासाठी पात्र असल्याचा पुरावा. |
| **१३.११** | अराखीव महिला, मागासवर्गीय, आदुघ, खेळाडू, माजी सैनिक, अनाथ आरक्षणाचा दावा असल्यास अधिवास प्रमाणपत्र |
| **१३.१२** | विवाहित स्त्रियांच्या नावात बदल झाल्याचा पुरावा. |
| **१३.१३** | मराठी भाषेचे ज्ञान असल्याचा पुरावा. |
| **१३.१४** | लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र. |
| **१३.१५** | महाराष्ट्र राज्याचा अधिवास असल्याबाबतचे प्रमाणपत्र (डोमिसाईल). |
| **१३.१६** | पदवीधर/पदविकाधारक अंशकालीन असल्याबाबातचे प्रमाणपत्र (शासन निर्णय क्र.पअंक-१००९/प्र.क्र.२००/२००९/१६-अ, दि.२७/१०/२००९ नुसार). |
| **१३.१७** | शासन निर्णय मानंम २०१२/प्र.क्र.२७७/३९, दि.०४/०२/२०१३ मध्ये नमूद प्रमाणे MS-CIT अथवा समकक्ष प्रमाणपत्र. |
| **१३.१८** | प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र. |
| **१३.१९** | भूकंपग्रस्त प्रमाणपत्र. |
| **१३.२०** | पात्रते संदर्भातील विविध दाव्याच्या अनुषंगाने आवश्यक कागदपत्रे/प्रमाणपत्रे इत्यादी. |

## १४. इतर सर्वसाधारण अटी / शर्ती / सूचना :-

| | |
|---|---|
| **१४.१** | उमेदवार हा भारताचा नागरिक असावा. आणि महाराष्ट्रात १५ वर्षे अधिवास (Domicile) करीत असल्याबाबतचे त्याने सक्षम प्राधिकरणाचे प्रमाणपत्र (तहसिलदार यांचे कार्यालयाकडील) किंवा महाराष्ट्रात जन्म झाल्याबावत जन्म दाखला अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहील. सर्वसाधारण रहिवासी या संज्ञेला भारतीय लोकप्रतिनिधित्व कायदा १९५० च्या कलम २० अनुसार जो अर्थ आहे तसाच अर्थ असेल. |
| **१४.२** | जातीच्या दाव्याच्या पृष्ठ्यर्थ महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतरमागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्यांच्या पडताळणीचे विनियम) अधिनियम, २००० मधील तरतुदीनुसार सक्षम प्राधिकारी यांचेकडून प्रदान करण्यात आलेले जातीचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. |
| **१४.३** | विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्गाचा दावा करणा-या (या प्रवर्गातील महिला, खेळाडू, माजी सैनिक, अपंग, अंशकालीन कर्मचारी, स्वातंत्र्यसैनिकांचे पाल्य, प्रकल्पग्रस्त, भुकंपग्रस्त या समांतर आरक्षणाचा दावा करणा-या) उमेदवारांनी उन्नत व प्रगत गटामध्ये मोडत आहेत, किंवा नाही याबाबत अर्जामध्ये स्पष्टपणे नमूद करणे आवश्यक आहे. |
| **१४.४** | परीक्षेचे प्रवेशपत्र, वेळापत्रक, बैठकव्यवस्था, कागदपत्रे पडताळणीसाठी पात्र उमेदवाराची यादी, निवेदने, तात्पुरती निवड व अतिरिक्त निवडसूची, अंतिम निवड व इतर सर्व सूचना या वेळोवेळी www.nmc.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येतील. त्याबाबत उमेदवारांना लेखी पत्रव्यवहार केला जाणार नाही. त्यामूळे उमेदवारांनी भरती प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत वेळोवेळी संकेतस्थळावरील सूचना पहाव्यात. संकेतस्थळावरील सूचना पाहिल्या नाहीत या कारणास्तव आलेल्या कोणत्याही तक्रारींची दखल घेतली जाणार नाही. |
| **१४.५** | उमेदवारी संदर्भातील कोणत्याही तरतुदी नाशिक महानगरपालिकेकडून कोणत्याही क्षणी पूर्वलक्षी प्रभावाने बदलण्याची शक्यता आहे. सदर बदल आवश्यकतेनुसार निदर्शनास आणण्यात येतील व ते संबंधितांवर बंधनकारक असतील. असे बदल नाशिक महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिद्ध करण्यात येतील. त्याकरीता उमेदवाराने नियमित नाशिक महानगरपालिकेच्या संकेतस्थळाचे अवलोकन करणे त्यांच्या हिताचे राहील. |
| **१४.६** | शासनाकडील किंवा खाजगी कंपनीकडील उमेदवाराने सरळसेवा भरती प्रक्रियेत अर्ज सादर केल्यापासून निवड प्रक्रिया संपेपर्यंतच्या कालात होणारे बदल, उदा. निलंबन, दंड, फौजदारी खटला, शिस्तभंग विषयक अथवा तत्सम कारवाई इत्या, |

Mahabharti.in

| | |
|---|---|
| | वेळोवेळी कळविणे आवश्यक आहे. अर्ज सादर केल्यानंतर घडून आलेले बदल न कळविल्यास अशा उमेदवाराची उमेदवारी रद्द करण्यात येईल. |
| **१४.७** | निवड प्रक्रिया सुरू झालेनंतर उमेदवाराची निवड झाल्यावर किंवा नियुक्ती दिल्यानंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने अर्जात व परीक्षेचे वेळी दिलेली माहिती अगर बनावट कागदपत्रे सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निर्देशनास आल्यास, त्या उमेदवारांची उमेदवारी, निवड, नियुक्ती कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल. याबाबत कोणताही पत्रव्यवहार विचारात घेतला जाणार नाही. |
| **१४.८** | नियुक्तीसाठी पात्र असणा-या उमेदवाराने विहित केलेली इतर बंधपत्र/प्रतिज्ञापत्र/वचनपत्र/करारपत्र इ. विशिष्ट स्वरूपात भरून दिल्याशिवाय महानगरपालिका सेवेत रुजू करून घेतले जाणार नाही. |
| **१४.९** | उमेदवाराने नोकरीसाठी केलेल्या अर्जात नमूद केलेली माहिती ही अंतिम समजण्यात येईल. अर्जातील माहिती बदलाबाबत नंतर कोणत्याही प्रकारचे अर्ज स्विकारले जाणार नाहीत अथवा बदल विचारात घेतले जाणार नाहीत. |
| **१४.१०** | निवड झाल्यास उमेदवारास रू. ५००/- च्या मुद्रांक पेपरवर नोटरी समोर आवेदनापत्रात नमूद केलेल्या माहितीच्या अचूकतेबाबत आणि सत्यतेबाबत प्रतिज्ञापत्र नियुक्तीपूर्वी सादर करावे लागतील. |
| **१४.११** | महानगरपालिकेने वेळोवेळी घेतलेले निर्णय उमेदवारांवर बंधनकारक असतील. |
| **१४.१२** | परीक्षेसाठी उपस्थित राहणा-या उमेदवारांना कोणत्याही प्रकारचा प्रवास खर्च देय राहणार नाही. |
| **१४.१३** | उमेदवारांनी अर्ज करण्याच्या दिनांकास सेवा प्रवेश नियमावलीतील तरतुदीनुसार शैक्षणिक अर्हता धारण करणे अनिवार्य आहे. |
| **१४.१४** | निवड झालेल्या उमेदवाराला नियमित तत्वावर नियुक्तीनंतर नाशिक महानगरपालिका सेवा विनियम व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी लागू होतील. |
| **१४.१५** | शासन निर्णय, माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि.) क्रमांक : मातंस-२०१२/प्र.क्र.२७७/३९, दिनांक ०४ फेब्रुवारी, २०१३ शासन पुरकपत्र, दिनांक ०८ जानेवारी, २०१८ व दिनांक १६ जुलै, २०१८ अथवा महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहित केलेले संगणक हाताळणी / वापरण्याबाबतचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील. तसेच वेळोवेळी शासनांचे प्रचलित शासकीय धोरण / नियम लागु राहतील. |
| **१४.१६** | नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्र. संकिर्ण/२००७/पडताळणी/नवि-२६, दि.२१/११/२००७ अन्वये, निवड झालेल्या उमेदवारांविरूद्ध कोणताही गुन्हा नोंदविलेला नाही अथवा सिध्द झालेला नाही असे चारित्र प्रमाणपत्र संबंधित पोलीस ठाण्याकडून प्राप्त झाल्यानंतर त्याची/तिची सदर पदावर नेमणूक केली जाईल. |
| **१४.१७** | सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन, यांचेकडील आदेश क्र.एस.आर.व्ही.-२०००/प्र.क्र.१७/२०००/२०१२, दि.०१/०७/२००५ नूसार लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र नियुक्तीच्यावेळी सादर करणे बंधनकारक राहील. |
| **१४.१८** | उपरोक्त पदावर अंतिम निवड झाल्यावर नियुक्तीपूर्वी उमेदवाराची बिटको रुग्णालय, नाशिक रोड अथवा सिव्हील रुग्णालय , नाशिक यांच्याकडून वैद्यकीय तपासणी केली जाईल व त्यामध्ये वैद्यकीय दृष्टया पात्र असल्याचे प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर नियुक्ती दिली जाईल. |
| **१४.१९** | उमेदवारांस मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे. त्यास मराठी लिहीता, वाचता व बोलता येणे आवश्यक आहे. |
| **१४.२०** | निवड झालेल्या उमेदवारांना मनपा अधिनियम, सेवाप्रवेश नियम, शासन आदेश, शासन धोरण यानुसार वेळोवेळी लागु केलेल्या तरतुदी तसेच वेतन भत्ते, निवृत्ती वेतन इ. लागु करणेत येईल. |
| **१४.२१** | उपरोक्त पदाकरीता नियुक्ती देण्यात आलेल्या उमेदवारांसाठी त्यांच्या नेमणुकीच्या मूळ दिनांकापासून दोन वर्षाचा परिविक्षाधीन कालावधी असेल. तसेच अशा उमेदवारांचे परिविक्षाधीन कालावधीतील काम समाधानकारक नसल्यास अपवादात्मक बाब आणि तत्संबंधी कारणे नमूद करून परिविक्षाधीन कालावधी ६ महिने वाढविता येईल. तद्नंतर या वाढीव कालावधीत काम समाधानकारक नसल्यास सदर कर्मचारी/अधिकारी यांची सेवा समाप्त करण्यात येईल. |
| **१४.२२** | ज्या पदांसाठी अनुभवाची आवश्यकता आहे, त्या अनुभव प्रमाणपत्रांची पडताळणी केल्यानंतरच सदर उमेदवारांना नियुक्ती देणेत येईल. |

## १५. **इतर :-**

| | |
|---|---|
| **१५.१** | परीक्षेच्या व्यवस्थापनामध्ये काही समस्या निर्माण झाल्यास समस्यांचे निराकरण करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील मात्र पुन्हा चाचणीसाठी उमेदवारांचा कोणताही दावा विचारात घेतला जाणार नाही. समस्या निराकरण करण्याच्या प्रक्रियेत जाण्यास इच्छूक नसलेले किंवा सहभागी होण्यास इच्छूक नसलेले उमेदवार प्रक्रियेतून नाकारले जातील |
| **१५.२** | भरतीशी संबंधीत सर्व बाबीमध्ये महापालिका आयुक्त यांचा निर्णय अंतिम असेल आणि उमेदवारावर बंधनकारक असेल. यासंदर्भात नाशिक महानगरपालिकेव्दारे कोणताही वैयक्तिक पत्रव्यवहार अथवा चौकशी केली जाणार नाही. |
| **१५.३** | परीक्षा एकापेक्षा जास्त सत्रात घेतल्यास, सत्रामध्ये वापरल्या जाणा-या वेगवेगळया चाचणीच्या काठीण्य पातळीतील किंचित फरक समायोजित करण्यासाठी विविध संचामधील गुणांकन समतुल्य केले जातील. केंद्राची क्षमता कमी असल्यास किंवा कोणत्याही केंद्रावर किंवा कोणत्याही उमेदवारासाठी काही तांत्रिक व्यत्यय आल्यास एकापेक्षा जास्त सत्र आवश्यकतेनुसार घेण्यात येतील. |
| **१५.४** | **<u>सामान्यीकरण प्रक्रिया (Normalisation Method)</u>**<br>एकाच दिवशी, एकापेक्षा जास्त सत्रांमध्ये किंवा अनेक दिवसांत, एकापेक्षा जास्त सत्रांमध्ये एखादया पदांची परीक्षा घ्यावी लागली तर त्या |

| | |
|---|---|
| | पदाच्या परीक्षेचा प्रथम दिवस ते अंतिम दिवस तसेच प्रथम सत्र ते अंतिम सत्र याबाबत "सामान्यीकरण प्रक्रिया" (Normalisation Method) करण्यात येईल. सामान्यीकरण प्रक्रियेचे सुत्र (Normalisation Method Formula) जाहिरातीसोबत जोडण्यात येत आहे |
| **१५.६** | **Groupwise Time Setter**<br>बहुपर्यायी वस्तुनिष्ठ ऑनलाईन परीक्षेमध्ये प्रत्येक विषयामधील सोपे, मध्यम व कठीण प्रश्न, गटामध्ये अंतर्भूत करून त्यानुसार प्रत्येक गटासाठी वेळ निश्चित करून त्याप्रमाणे परीक्षेमध्ये "ग्रुप लेवल टायमरची" अंमलबजावणी करण्यात येईल. |
| **१५.७** | महापालिका वैयक्तिक उमेदवारांनी नोंदविलेल्या उत्तरांचे विश्लेषण इतर उमेदवारांच्या बरोबर आणि चुकीच्या उत्तरांच्या मधील समानता शोधण्यासाठी करेल. या संदर्भात महापालिकेद्वारे अवलंबलेल्या विश्लेषणात्मक प्रक्रियेत उत्तरे सामायिक केली गेली आहेत आणि मिळालेले गुण वैध नाहीत असा निष्कर्ष काढला गेला असेल, तर महापालिका संबंधित उमेदवाराची उमेदवारी रद्द करण्याचा अधिकार राखून ठेवत असून अशा अपात्र उमेदवारांचे निकाल रोखले जातील. |
| **१५.८** | निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर उमेदवाराने चुकीची माहिती प्रदान करणे आणि / किंवा प्रक्रियेचे उल्लंघन केल्याच्या घटनांमुळे उमेदवार निवड प्रक्रियेतून अपात्र ठरेल आणि त्याला/तिला भविष्यात महापालिकेच्या भरती प्रक्रियेस उपस्थित राहण्याची परवानगी दिली जाणार नाही. अशी अपात्रता, नंतर आढळून आल्यास पूर्वलक्षी प्रभावाने उमेदवार अपात्र होईल. |
| **१५.९** | जाहिरातीमध्ये नमूद केलेली शैक्षणिक किंवा तदनुषंगिक अर्हता अर्ज सादर करतेवेळी उमेदवाराने धारण करणे अनिवार्य आहे. |

## १६. **विशेष सूचना :-**

| | |
|---|---|
| **१६.१** | नाशिक महानगरपालिकेस सादर करण्यात आलेली सर्व कागदपत्रे / अभिलेखे हे महानगरपालिकेच्या अभिलेखाचा भाग होतील व शासकीय नियमानुसार वापरण्यात येतील. |
| **१६.२** | जर एखाद्या उमेदवाराने भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर कोणत्याही प्रकारचा दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास किंवा अनुचित माध्यमाचा अवलंब केल्याचे किंवा तोतया व्यक्तीची व्यवस्था केल्याचे आढळल्यास त्याला निवडीतून अपात्र ठरविण्यात येईल. |
| **१६.३** | मध्यस्थ / ठग / नाशिक महानगरपालिकेत संबंध असल्याचे भासविणाऱ्या व्यक्ती, यांच्या गैरमार्गाने नोकरी मिळवून देण्याच्या आश्वासनापासून सावध राहण्याच्या उमेदवारांना सूचना देण्यात येत आहेत. |
| **१६.४** | यापूर्वी सदर पदांसाठी अर्ज केलेल्या उमेदवारांनी या जाहिरातीस अनुसरून पुन्हा नव्याने अर्ज करणे आवश्यक आहे. |
| **१६.५** | परीक्षेची वेळ, दिनांक, ठिकाण, परीक्षेचे प्रवेशपत्र (Hall Ticket) याबाबत वेळोवेळी नाशिक महानगरपालिका संकेतस्थळावर कळविण्यात येईल, याबाबतची दक्षता स्वतः उमेदवाराने घेणे आवश्यक आहे. |
| **१६.६** | वेगवेगळ्या सत्रांमध्ये पार पडणाऱ्या परिक्षेमधील प्रश्नपत्रिका वेगवेगळ्या असतील. अशा वेळी परीक्षार्थीची संख्या विचारात घेऊन परीक्षा एकापेक्षा अनेक सत्रांत पार पाडावयाची झाल्यास भिन्न प्रश्नपत्रिकांच्या काठिण्य पातळीचे समानीकरण (Normalization) करण्यात येईल व त्यासाठी Mean Standard Deviation Method या सूत्र पद्धतीचा अवलंब करण्यात येईल. |
| **१६.७** | परीक्षे संबंधी / प्रतिक्षा यादी / कागदपत्रे तपासणी बाबत / नियुक्ती आदेश याबाबतची माहिती केवळ SMS/Email द्वारे कळविण्यात येईल. कोणताही पत्र व्यवहार पोष्टा मार्फत / पत्त्यावर केला जाणार नाही. नाशिक |
| **१६.८** | प्राप्त अर्जाची संख्या लक्षात घेता परीक्षेची वेळ, दिनांक व ठिकाण यामध्ये बदल होऊ शकतो. याबाबत अर्जदारांची तक्रार विचारात घेतली जाणार नाही. |
| **१६.९** | उपरोक्त पदाच्या भरती प्रक्रियेबाबतचे सर्व अधिकार महापालिका आयुक्त, नाशिक महानगरपालिका यांना असून कोणत्याही टप्प्यावर भरती स्थगित, रद्द किंवा काही बदल करण्याचे अधिकार महापालिका आयुक्त, नाशिक महानगरपालिका यांनी त्यांचेकडे राखून ठेवले आहेत. |

Mahabharti.in

दिनांक :-०४/११/२०२५
ठिकाण :- नाशिक

सही /-
(मनिषा खत्री, भाप्रसे)
आयुक्त तथा प्रशासक
नाशिक महानगरपालिका, नाशिक

## Mean Standard Deviation Method

$$\widehat{M}_{ij} = \frac{\overline{M}_t^g - M_q^g}{\overline{M}_{ti} - M_{iq}} \left(M_{ij} - M_{iq}\right) + M_q^{gm}$$

Where:

$\widehat{M}_{ij}$ = Normalized marks of $j^{th}$ candidate in the $i^{th}$ shift.

$\overline{M}_t^g$= is the average marks of the top 0.1% of the candidates considering all shifts (number of candidates will be rounded-up).

$M_q^g$= is the sum of mean and standard deviation marks of the candidates in the examination considering all shifts.

$\overline{M}_{ti}$= is the average marks of the top 0.1% of the candidates in the $i^{th}$ shift (number of candidates will be rounded-up).

$M_{iq}$= is the sum of mean marks and standard deviation of the $i^{th}$ shift.

$M_{ij}$= is the actual marks obtained by the $j^{th}$ candidate in $i^{th}$ shift.

$M_q^{gm}$= is the sum of mean marks of candidates in the shift having maximum mean and standard deviation of marks of candidates in the examination considering all shifts.

Calculation of marks will be done up to 5 decimal places.

Mahabharti.in